मुंबई । मुंबई उपनगर । नवी मुंबई । ठाणे । रायगड । पालघर । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरीत होणारे दैनिक ■ Epaper-bittambatami.com ■ बित्तंबातमी/bittambatmi■ bittambatmi@gmail.com ■ https://twitter.com/bittambatami

# बित्तंबातमी!

● ठाणे । शुक्रवार, १५ मार्च २०२४ । वर्ष । ४१ । अंक । १८२ । पाने । ६ । मूल्य ३ रुपये ●

## थोडक्यात

### शरद पवारांचे फोटो वापरण्यास अजित पवार गटाला 'सुप्रीम' बंदी

नवी दिल्ली : शरद पवारांचे फोटो वापरण्यास अजित पवार गटाला आज सुप्रीम कोर्टाने बंदी घातलीय. शरद पवार यांच्या नावाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वापर करणार नाही, असे हमीपत्र दाखल करण्यास न्यायालयाने अजित पवार गटाला सांगितले. अजित पवार यांच्या गटाला अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता देण्याच्या आणि त्यांना घड्याळ चिन्ह वाटप करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या शरद पवार यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

शरद पवार गटाची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी म्हणाले की, अधिकृत गट शरद पवार यांच्याशी ऐतिहासिकदृष्ट्या संबंधित असलेले 'घड्याळ' चिन्ह आणि प्रचार साहित्यात ज्येष्ठ पवारांची नावे आणि छायाचित्रे वापरत आहे. सिंघवी यांनी छगन भुजबळ यांनी केलेले विधान वाचून दाखवले. ग्रामीण मतदारांना आकर्षित करण्यासाठी पोस्टरमध्ये 'घड्याळ' चिन्ह आणि शरद पवारांची चित्रे वापरावीत, असे भुजबळ म्हणताना दिसतात.

### माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील प्रकृती बिघडल्याने रुग्णालयात दाखल

पुणे : भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांची प्रकृती बिघडली आहे. त्यांना पुण्यातल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पुण्यातल्या भारती रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. त्यांना ताप आला आहे. त्याचप्रमाणे त्यांना छातीमध्ये इनफेक्शन झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांना पुढील दोन ते तीन दिवस रुग्णालयात ठेवण्यात येणार आहे अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे. एएनआयने या विषयीचं वृत्त दिलं आहे.

प्रतिभा पाटील यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना पुण्यातल्या भारती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. आज सकाळीच त्यांची प्रकृती जास्त बिघडली. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत आणि त्या उपचारांना योग्य प्रतिसाद देत आहेत अशीही माहिती डॉक्टरांनी दिली आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत त्यांची प्रकृती सुधारली तर त्यांना घरी सोडण्यात येईल असं डॉक्टरांनी स्पष्ट केलं आहे.

### कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये जमीन खरेदी करणारं महाराष्ट्र पहिलं राज्य

मुंबई : कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये जमीन खरेदी करणारे महाराष्ट्र हे पहिल राज्य ठरले आहे. राज्य सरकारने काश्मीरमधील श्रीनगरमध्येदेखील महाराष्ट्र भवन उभारण्याची योजना आखली आहे. बुधवारी (१३ मार्च) राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रीनगरमधील महाराष्ट्र भवनाच्या उभारणीला मंजुरी देण्यात आली. काश्मीरला भेट देणाऱ्या महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी तसेच महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांसाठी काश्मीरमध्ये सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. यासाठी महाराष्ट्र सरकार जम्मू काश्मीरमध्ये जमीन खरेदी करणार आहे. असं करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरणार आहे.

# अबब ! १२०८ कोटींची बंपर लॉटरी कुणाला ?

## निवडणूक रोख्यांची माहीती जाहीर

स्वाती घोसाळकर

मुंबई : सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार निवडणूक आयोगाने काल निवडणूक रोख्यांची महिती त्यांच्या संकेत स्थळावर जाहिर केलीय. या यादीत सर्वाधिक निवडणूक रोख्यांची खरेदी केरळ स्थित एका लॉटरी विक्रेत्याने केली असून त्याने तब्बल १२०८ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केल्याचे उघडकीस आले आहे. फ्युचर गेमिंग आणि हॉटेल सर्व्हिसेस कंपनीच्या माध्यमातून ही 'लॉटरी मार्टीन' नावाची लॉटरी कोईम्बतूरमधून चालवली जाते. कोणकोणत्या पक्षाला हा १२०८ कोटी रुपयांचा जॅकपॉट लागलाय याची उकल मात्र या माहीतीतून अद्याप होऊ शकलेली नाही. मार्टीन लॉटरीनंतर या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे मेघा इंजिनिअरींग आणि इन्फास्ट्रक्चर लिमिटेड ही कंपनी. पायाभूत सुवीधा निर्मितीत ही कंपनी आघाडीवर असून महाराष्ट्रातील समृध्दी महामार्ग निर्मितीत त्यांचा मोठा वाटा आहे. मेगा इंजिनिअरींगने तब्बल ९८० कोटींचे निवडणूक रोखे खरेदी केले होते. समृद्धी मार्गावरील निर्मीतीदरम्यान पुलाची कमान कोसळून मजदूराचा झालेल्या मृत्यूमुळे ही कंपनी चर्चेत आली होती.

२०१९ नंतर या निवडणूक रोख्यांची खरेदी केली गेली आहे. निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या माहितीनुसार हे निवडणूक रोखे वटवणाऱ्यांच्या यादीत भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, एआयडिएमके, बीआरएस, शिवसेना, तेलगू देसम पार्टी, वायएसआर काँग्रेस, डीएमके, जेडीएस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, तृणमूल काँग्रेस, जनता दल युनायटेड, राष्ट्रीय जनता दल, आप आणि समाजवादी पार्टी हे पक्ष आघाडीवर आहेत.

### कोण आहे मार्टीन लॉटरीचा मालक?



राजकीय पक्षांना १२०८ कोटीचे दान करणारे मार्टीन लॉटरीचे मालक आहेत सांत्यियागो मार्टीन. भारतातील लॉटरी किंग म्हणून ओळख असणाऱ्या सांत्यियागो मार्टीन यांनी १९९१ साली फ्युचर गेमिंग आणि हॉटेल सर्व्हिसेस ही कंपनी स्थापन केली. त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध माहितीनुसार वयाच्या १३ व्या वर्षापासून सांत्यियोगो हे लॉटरीच्या विश्वात कार्यरत आहेत. गेल्या ३४ वर्षात त्यांनी भारतात लॉटरीचे जाळे पसरवले आहे. १३ राज्यात मिळून कंपनीत आजमितीस तब्बल एक हजार कर्मचारी कार्यरत आहेत. महाराष्ट्राचाही त्यात समावेश आहे.

### टॉप सहा देणगीदार

१ फ्युचर गेमिंग अँड हॉटेल सर्व्हिस पीआर - १२०८ कोटी

२ मेघना इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड -८२१ कोटी,

३ क्विक सप्लाय चेन प्रायव्हेट लिमिटेडन - ४१० कोटी,

४ हल्दिया एनर्जी लिमिटेड - ३७७ कोटी,

५ वेदांता लिमिटेड- ३७५.६५ कोटी,

६ एस्सेल मायनिंग आणि इंडस्ट्रीज लिमिटेड- २२४.५ कोटी

७ वेस्टर्न युपी पॉवर ट्रान्समिशन कंपनी - २२० कोटी

८ केव्हेंटर फुडपॅक इन्फ्रा लिमिटेड - १९५ कोटी

९ मदन लाल लिमिटेड- १८५.५ कोटी

१० भारती एअर टेल लिमिटेड - १८३ कोटी

## 'अजिंक्य' मुंबई !



अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली मुंबईने वानखेडवर दिमाखात रणजी विजेतेपद पटकावले. रणजी ट्रॉफी जिंकण्याची मुंबईची ही ४२ वी वेळ आहे. तर फायनल गाठण्याची मुंबईची ही ४८ वी वेळ आहे. तब्बल आठ वर्षांच्या खंडानंतर मुंबईने ही अजिंक्य कामगिरी केली आहे. फायनलमध्ये मुंबईने विदर्भ संघाचा १६९ रन्सने पराभव केला. (अधिक वृत्त पान ६ वर...)

## मातोश्रीवर लोटांगण घातले तेव्हा घराणेशाही दिसली नाही का?- ठाकरे

दापोली :

अमित शाह सध्या आमच्यावर घराणेशाहीचा आरोप करतात. पण २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीवेळी अमित शाह यांनी मातोश्रीवर येऊन लोटांगण घातले होते. त्यावेळी अमित शाह यांना घराणेशाही दिसली नाही का, अस परखड सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. काही दिवसांपूर्वी अमित शाह यांनी जळगाव येथील सभेत घराणेशाहीच्या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना लक्ष्य केले होते. अमित शाहांच्या या वक्तव्याचा उद्धव ठाकरे यांनी समाचार घेतला. ते गुरुवारी दापोलीत आयोजित करण्यात आलेल्या सभेत बोलत होते.

उद्धव ठाकरे यांनी आपल्य भाषणात अमित शाह यांच्यावर टीका करताना म्हटले की, २०१४ आणि २०१९ साली अमित शाह यांनी मातोश्रीवर येऊन लोटांगण घातले. त्यावेळी त्यांना घराणेशाही दिसली नाही का? मातोश्रीवर येऊन गेल्यानंतर अमित शाह यांनी घात केला, दिलेला शब्द मोडला. आमचं हिंदुत्त्व कोणाच्या पाठीत खंजीर खुपसणारे नाही. परंतु, अमित शाह यांचं कामच पाठीत खंजीर खुपसणे हेच आहे. पण पाठीत खंजीर खुपसला की समोरच्याचा कोथळा बाहेर काढायचा, ही शिवाजी महाराजांची शिकवण आहे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

# दोन्ही निवडणूक आयुक्तांची नियुक्ती

नवी दिल्ली :

ज्ञानेश कुमार आणि बलविंदर संधू या दोन अधिकाऱ्यांची निवडणूक आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभेतील काँग्रेसचे नेते अधीर रंजन चौधरी यांनी ही माहिती दिली. त्यामुळे आता कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांना नवनियुक्त आयुक्त मदत करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि लोकसभेतील काँग्रेसचे नेते अधीर रंजन दास यांच्या समितीने या दोन्ही नावांना संमती दिल्याची माहिती आहे.

अरूण गोयल यांनी लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजीनामा दिल्यानंतर एकून रिक्त पदांची संख्या दोन झाली होती. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने पावलं उचलून या निवडी केल्या आहेत. यासंबंधीची माहिती देताना अधीर रंजन चौधरी म्हणाले की, या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, अर्जुन राम मेघवाल आणि माझ्या समितीने या नियुक्त्या केल्या आहेत. मीटिंगमध्ये मी एक छोटी यादी मागितली होती. त्यावेळी छोटी यादी सादर करावी असे सांगण्यात आले. कारण निवडीपूर्वी छोट्या याद्या बनवल्या जातात. त्यामुळेच मी ती यादी मागितली होती. ती यादी मला लवकर मिळाली असती तर दिल्लीत पोहोचल्यावर मला उमेदवारांची माहिती मिळाली असती. पण ती संधी मला मिळू शकली नाही.

### एकूण २१२ नावांची यादी देण्यात आली होती




अधीर रंजन चौधरी म्हणाले की, मला दिलेल्या यादीत २१२ नावे होती. मी काल रात्रीच दिल्लीत आलो. सकाळी १२ वाजता निवड बैठकीला जाण्यापूर्वी ही सर्व नावे जाणून घेणे कठीण होते. अशा परिस्थितीत ही २१२ नावे बघून काय उपयोग? आमच्या समितीत पंतप्रधान आणि गृहमंत्री आहेत आणि मी एकटाच विरोधी पक्ष आहे. सुरुवातीपासून या समितीतील बहुमत सरकारच्या बाजूने आहे. अशा परिस्थितीत सरकारला जे हवे ते होईल. सरकारच्या इराद्यानुसार निवडणूक आयुक्तांची निवड केली जाईल. अरुण गोयल यांच्या नियुक्तीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने सांगितले होते की त्यांची नियुक्ती ही घाईगडबडीत करण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्या अडचणीत वाढ झाली होती. त्यांच्या राजीनाम्यानंतर बलविंदर संधू आणि ज्ञानेश कुमार या दोन व्यक्तींची निवड करण्यात आली आहे.

# ममता बॅनर्जींच्या डोक्याला गंभीर दुखापत



कोलकात्ता :

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेस पक्षाच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. ममता बॅनर्जी यांना कोलकात्यामधील एसएसकेएम रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार चालू आहेत.घरात ट्रेड मिलवर व्यायाम करत असताना तोल गेल्यामुळे ही दुखापत झाली असल्याची सुत्रांची माहिती आहे.

तृणमूल काँग्रेसने त्यांच्या एक्स हँडलवरून या दुखापतीची माहिती दिली आहे. टीएमसीने त्यांच्या एक्सवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे की, "आमच्या अध्यक्षांना गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यासाठी प्रार्थना करा." टीएमसीने ममता बॅनर्जी यांचा एक फोटोदेखील शेअर केला आहे. यामध्ये त्यांच्या कपाळाला गंभीर इजा झाल्याचं दिसत आहे. कपाळातून रक्तस्राव होत असून रक्ताचे ओघळ मानेपर्यंत घसरले आहेत.

तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस आणि ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांनी ममता यांना रुग्णालयात दाखल केलं आहे. ममता बॅनर्जी यांचा दोन महिन्यांपूर्वी अपघात झाला होता. वर्धमान येथून कोलकात्याला जाताना ममता बॅनर्जी यांच्या कारचा अपघात झाला होता. वर्धमानमधील पावसामुळे ममता बॅनर्जी नियोजित कार्यक्रम सोडून घरी परतत होत्या. शिवाय त्या हेलिकॉप्टरने प्रवास करू शकत नव्हत्या. त्यामुळे त्या कारने माघारी परतत होत्या.

# अजित पवारांशी पंगा घेणारे शिवतारे वर्षात 'वेटिंगवर'

शैलेश तवटे

मुंबई : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवारांशी पंगा घेणारे विजय शिवतारे आता 'वेटिंग मोडवर' आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांना वर्षावर बोलावून घेतले होते. पण सात तास ताटकळत ठेवून अखेर त्यांना भेटीचा वेळ दिला.

या भेटीसाठी शिवतारे हे १५० कार्यकर्ते सोबत घेऊन आले होते. अजित पवारांशी आपल्याला कसा त्रास दिला याचा पाढा आपण मुख्यमंत्र्यांकडे वाचला. त्यांनी माझ्या भावना समजून घेतल्या आहेत. संबधितांशी ते याबाबत बोलणार आहेत. यासाठी दोन दिवस मला शांत रहाण्यास सांगितले आहे. दोन दिवसानंतर आमची पुन्हा या विषयावर चर्चा होईल असे शिवतारे म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितल्यानंतर तुम्ही



बारामतीमधून लोकसभा निवडणूक लढण्याचा निर्णय मागे घेणार का, असा प्रश्न यावेळी विजय शिवतारे यांना विचारण्यात आला. त्यावर शिवतारे यांनी म्हटले की, मी गेल्या ४ दिवसांपासून लोकसभा निवडणूक लढणार असल्याचे सांगत आहे. मुख्यमंत्र्यांनी माझं म्हणणं ऐकून घेतलं आहे. बारामतीमधून उमेदवारी मागे घ्यायला अजून लोकसभेचे फॉर्म भरलेले नाहीत किंव उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत नजीक येऊन ठेपलेली नाही. त्यामुळे मी बारामीत मतदारसंघातून उमेदवारी मागे घेणार की नाही, हे ठरवण्यासाठी बराच अवधी आहे.

### महायुतीत एकोपा ठेवण्याची गरज-अजित पवार

मुंबई : अजित पवार म्हणाले की, शिवतारे यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याची बातमी मी पाहिली असून आमचे काही सहकारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलले असून मी सुद्धा बोललो आहे. महायुतीत एकोपा ठेवण्याची नितांत गरज आहे, विधाने करताना महायुतीला त्रास होणार नाही, भावना दुखावल्या जाणार नाहीत, असा प्रयत्न सर्वांनी करायला हवा, असे त्यांनी नमूद केले.

## महाविकास आघाडीची जागावाटपासाठी

# आजच मुंबईत तातडीची बैठक

मुंबई :

महाविकास आघाडीची लोकसभेच्या जागा वाटपासाठी आज शुक्रवारी तातडीची बैठक मुंबईमध्ये बोलावण्यात आली असून काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात राहुल गांधींची भारत जोडो यात्रा सोडून मुंबईसाठी तातडीने रवाना झाले आहेत. या बैठकीसाठी वंचित बहुजन आघाडीला निमंत्रण नाही. राज्यात भाजपकडून पहिली यादी जाहीर झाल्यानंतर आता महाविकास आघाडीकडून सुद्धा जागा वाटपासाठी ही महत्वाची बैठक बोलावण्यात आली आहे.

या बैठकीमध्ये जागावाटपावर महत्त्वाचा निर्णय होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या बैठकीसाठी वंचित बहुजन आघाडीला निमंत्रण देण्यात आलेलं नाही. पहिल्यांदा हे तिन्ही पक्ष वंचितकडून देण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा करतील आणि त्यानंतर वंचित बहुजन आघाडीशी चर्चा केली जाणार आहे. उद्या मुंबईमध्ये हॉटेल ट्रायडंटमध्ये ही बैठक होणार असून या बैठकीसाठी शिवसेना ठाकरे गटाकडून संजय राऊत उपस्थित राहणार आहेत.

### वंचितच्या प्रस्तावावर चर्चा होणार



काँग्रेसकडून बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह केसी वेणुगोपाल सुद्धा उपस्थित राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून जयंत पाटील बैठकीसाठी उपस्थित असणार आहेत. ज्या जागांवरती तिन्ही पक्ष आग्रही आहेत. त्या संदर्भात पुन्हा एकदा बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीला जागा किती सोडायच्या यावरून महाविकास आघाडीमध्ये मतमतांतरे आहेत. मात्र, वंचितला चार जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या अनुषंगाने सुद्धा बैठकीमध्ये चर्चा होण्याची शक्यता आहे. भाजपकडून २० उमेदवार जाहीर करण्यात आल्याने किमान या मतदारसंघांमधील महाविकास आघाडीकडून आपापले २० उमेदवार निश्चित केले जाऊ शकतात.

# निवडणूक आयोगाची बँक खाते व्यवहारांवर राहणार करडी नजर

अनिल ठाणेकर

ठाणे : निवडणूक आयोगाने राष्ट्रीयकृत बँका, को-ऑपरेटिव्ह बँका व खाजगी बँकांकडून रोख रक्कम रेमिटन्सद्वारे आणावयाची असेल किंवा पाठवायची असेल तसेच रोखीचे मोठे व्यवहार होत असतील तर त्याकरिता संबंधित बँकेच्या प्रत्येक शाखेच्या शाखा प्रबंधकाना एक क्यूआर कोड देण्यात येणार आहे. त्याकरिता प्रत्येक बँकेने त्यांच्या मुख्य शाखेतून एक नोडल ऑफिसर ची नेमणूक करणे आवश्यक आहे.

भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार मुख्य बँकेतील नोडल ऑफिसर चे युजर आयडी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तयार करून दिले जाईल आणि त्या नोडल ऑफिसरने त्यांच्या बँकेच्या सर्व शाखा प्रबंधकाचे यूजर आयडी तयार करणे आवश्यक आहे, कारण प्रत्येक शाखेची कॅश मुव्हमेंट होत असताना त्या शाखेकडून क्यू आर कोड जनरेट होणे अत्यावश्यक आहे. क्यू आर कोड नसताना जर कॅश रेमिटन्स केली आणि ती कॅश निवडणूक अधिकाऱ्याकडून पकडण्यात आली, तर त्याच्यावर आयोगाकडील मार्गदर्शक सूचनांनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घेण्याविषयी आवाहन करण्यात आले आहे.

# निलेश लंकेनी तुतारी फुंकली : शरद पवारांच्या गटात प्रवेश

पुणे :

राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अजित पवारांसोबत जाणारे आमदार निलेश लंके यांनी लोकसभा निवडणूकीच्या धामधुमीत आपली वेळ बदलत तुतारी फुंकण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष कार्यालयात पक्षाध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या सोबत पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आपला राजकीय प्रवास निश्चित केलाय. पक्षांतर बंदीची टांगती तलवार टाळण्यासाठी या पत्रकार परिषदेत कुठेही लंके हे शरद पवार गटात सामिल झाले आहेत असे कुणीही म्हटले नाही. केवळ प्रतिकात्मक



त्यांना तुतारी भेट देण्यात आली. त्याआधी खासदार अमोल कोल्हे आणि मनसेला सोडचिठ्ठी दिलेले माजी नगरसेवक वसंत मोरे हे दोघेही पक्ष कार्यालयात दाखल झाले. निलेश लंके आणि वसंत मोरे हे दोघेही तुतारी फुंकून, राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश करणार अशी शक्यता होती. त्याप्रमाणे निलेश लंके यांनी प्रवेश केला, मात्र वसंत मोरे यांनी प्रवेश न करता, ते माघारी परतले.

पारनेरचे आमदार निलेश लंके हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर अजित पवारांसोबत गेले होते. ते अहमदनगर लोकसभा लढवण्यासाठी इच्छुक आहेत. मात्र हा मतदारसंघ महायुतीमध्ये भाजपच्या वाट्याला गेला आहे. त्यामुळे निलेश लंके हे अजितदादांची साथ सोडून शरद पवार गटात सहभागी झाले.

दुसरीकडे मनसे सोडलेले फायरब्रँड नेते वसंत मोरे हे सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या कार्यालयात दाखल झाले.

### वसंत मोरे प्रवेश न करताच माघारी

मी पक्षप्रवेशासाठी आलेलो नाही. मला सुप्रियाताईंनी आजची वेळ दिली होती, त्यामुळे मी आलो होतो. काँग्रेसच्या मोहन जोशी यांच्याशी चर्चा केली, शिवसेना नेत्यांशी पण केली. पुण्यात एक वेगळा प्रयोग होऊ शकतो. कसब्याची पुनरावृत्ती करायची असेल तर त्याला वसंत मोरे कशाप्रकारे उमेदवार असू शकतो हे सांगायला मी शरद पवारांकडे आलो होतो, असं वसंत मोरे यांनी सांगितलं. मी शरद पवारांना सांगितला आहे मी लोकसभेसाठी इच्छुक आहे. ते महाविकास आघाडीतील मोठे नेते आहेत ते इतर मोठ्या नेत्यांना देखील सांगू शकतात समजू शकतात. पुढील दोन दिवसात मी माझी भूमिका स्पष्ट करेन, असं वसंत मोरे म्हणाले.

### जाहिर नोटीस

मी श्रीमती कैलासीदेवी मानिकराम यादव, जाहिर करते की, मौजे-उल्हासनगर- ५ जि. ठाणे. येथील आकाश कॉलनी, चाळ नं १३ बी, रुम नं ९ ही वार्ड नं ५५ मिळकत क्रमांक ५५ डीओ ०१३७३८१०० पैकी मिळकत श्री. नजरुम नबीसददीन मंडल यांचेकडून खरेदीखताने कायम विकत घेतली आहे. सदरील मिळकत उल्हासनगर महानगरपालीका, उल्हासनगर–३ येथे माझे नावाची नोंद होणे करीता मी अर्ज केलेला आहे. तरी सदरील मिळकतीबाबत जर कुणाचाही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह ७ दिवसात मा. उपआयुक्त तथा कर निर्धारक, उल्हासनगर महानगर पालीका, उल्हासनगर-३, जि. ठाणे यांचेकडे परस्पर करावी. नंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
कैलासीदेवी मानिकराम यादव

### -: जाहीर नोटीस :-

तमाम जनतेस कळविण्यात येते की सदनिका क्र. 5 / 6, बसेश्वर को. ऑप. हो. सोसा. ली., पंचायत विहिरीजवळ, ठाकुली, डोंबिवली पूर्व, ता. कल्याण, ही आमचे अशिल श्री. सुनिल गणेश राजाध्यक्ष यांच्या मालकी व कब्जा वहिवाटीची आहे. वर नमुद सदनिका एम. एस. बिल्डर्स यांच्याकडून आमच्या अशिलांनी सन ०७/१२/१९८५ चे दरम्यान घेतली होती. सदर सदनिकेचे मूळ शेअर सर्टीफिकेट नं. ४४, शेअरर्स नं. २१६ ते २२० आमचे अशिलाकडून हरवलेले आहे. या बाबतची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात आमच्या अशिलांनी नोंदवली आहे. आमचे अशिल सदर गृह निर्माण संस्थेचे कायदेशिर सभासद आहेत. तरी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की सदर सदनिकेवर वा त्या करारनाम्यावर कोणाचाही हरकत या नोटीसीचे तारखेपासून १५ दिवसाच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात योग्य त्या पुराव्यासह हरकत रजिस्टर पत्राने पाठवावी. त्यानंतर कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरण्यात येईल.
दिनांक : १५/०३/२०२४ ॲडव्होकेट
सही/-
सौ. वनश्री वैभव मालवणकर डी-१/२०२, सृष्टी रेसिडन्सी टाईप
डी सि. एच. एस. लि., कांचनगांव, डोंबिवली - पूर्व, ४२१२०१
कार्यालयीन वेळ : सायं ७.00 ते ९.00 वा.

वकील- रविंद्र यादव

### जाहीर नोटीस
### कल्याण येथील मे. दिवाणी न्यायाधिश (व. स्तर) यांचे कोर्टात

चौकशी अर्ज क्र. २३२/२०२४ नि.क्र.०५

१ ) श्री . रत्नाकर रंगनाथ शिंदे
२) सौ. लता रत्नाकर शिंदे
दोघेही राहणार - बी- ४०६, ४ था मजला, चंद्रेश कुंज, मानपाडा रोड, लोढा हेवन, निळजे, डोंबिवली पूर्व, ता. कल्याण, जि. ठाणे.
पत्ता बी / ९५, लक्ष्मी कॉटेज, दुसरा मजला, डॉ. बी. ए. रोड, परेल टेलीफोन कॉम्पलेक्स जवळ, परेल, मुंबई - ४०० ०१२ ...... अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही ....सामनेवाला

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ यांची आई व अर्जदार नं. २ यांची सासू कस्तुरीबाई रंगनाथ शिंदे यांचे दिनांक १७/०४/२०२३ रोजी डोंबिवली पूर्व येथे निधन झालेले आहे. कस्तुरीबाई रंगनाथ शिंदे यांनी त्यांचे हयातीत खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत सह दुय्यम निबंधक, कल्याण -४ यांचे कार्यालयात दि. २१/०२/२०२२ रोजी मृत्युपत्र नोंदणीकृत केलेले असून त्याचा दस्त क्र . २१८०/२०२२ असा आहे.

**मिळकतीचे वर्णन**

तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मौजे निळजे येथील सर्व्हे नं. १२६ / १ पैकी, २ पैकी, १२८ / २, १५१/२, १५३, १५५/२ पैकी, ४/१ पैकी ४/२ पैकी, ४/३, ४/५, ५ पैकी, ६, ७/१, ७/२, १५६/१/१, २०७/१ पैकी, २ पैकी, ३ पैकी ४ या जमिन मिळकती वरील सदनिका नं. ४०६, ४ था मजला, क्षेत्र ४९५ चौ. फुट, बी-विंग, चंद्रेश कुंज ए, बी, सी को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., (चंद्रेश कुंज) मानपाडा रोड, लोढा हेवन, निळजे, डोंबिवली पूर्व, ता. कल्याण, जि. ठाणे .

आणि त्या अर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात दि इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ अन्वये अर्जदारांचे नावे प्रोबेट मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. तरी संबंधितांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे लाभात प्रोबेट करणेकामी कोणाची काही हरकत, हक्क हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी पुराव्यानिशी स्वतः वा वकीलामार्फत आपली हरकत या अर्जाचे कामी दाखल करावी. मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास अर्जदाराने अर्जात विनंती केलेप्रमाणे अर्ज मान्य करून आदेश पारित करतील याची नोंद घ्यावी.
ही नोटीस माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे. दि. १३/०३/२०२४

सही/- हुकूमावरून.
लिपीक (कोर्टाचा शिक्का) सही/-
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर) कल्याण

### जाहीर नोटीस

दिनांक :- १४/०३/२०२४

तमाम नागरिकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. चंद्रकांत मधुसुदन नाईक आणि श्री. सुनिल मधुसुदन नाईक, दोघे सज्ञान, रा. सिध्दी विनायक मंदिर रोड, ५१/ गिरिकुंज, नव दत्तात्रय को. ऑप. हौसिंग सोसायटी, ठाणे (पुर्व) ४००६०३. यांचे वडिल कै. मधुसुदन वासुदेव नाईक हे दिनांक १३/१०/२०१४ रोजी मृत्यु पावले आहेत व आई कै. मालती मधुसुदन नाईक हि दिनांक ०२/०५/२००० रोजी मृत्यु पावली आहे.
तद्नंतर आमचे अशिल व त्यांचे भाऊ कै. अनिल मधुसुदन नाईक (अविवाहीत) आणि वहिण कै. सुरेखा मधुसुदन नाईक (अविवाहीत) यांचे चौघांच्या एकत्रित नांवे मौजे- कुर्ला, मुक्तानंद को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., बी विंग, रुम नं. ३०५, ३रा मजला, न्यू हॉल रोड, कुर्ला (प), मुंबई - ४०००७०. येथे रूम मिळकत असुन ज्याचे एकुण मिळकत क्षेत्रफळ ६२५ चौ.फुट (कारपेट) अशा वर्णनाची रूम मिळकत आहे. तसेच आमचे अशिलांचे भाऊ कै. अनिल मधुसुदन नाईक (अविवाहीत ) हे दिनांक ०४/०८/२०२३ रोजी मृत्यु पावले आहेत आणि वहिण कै. सुरेखा मधुसुदन नाईक (अविवाहीत) हि दिनांक १५/०८/२०२३ रोजी मृत्यु पावली आहेत त्यांचे मृत्यु पश्चात आज रोजी त्यांस आमचे अशिल श्री. चंद्रकांत मधुसुदन नाईक आणि श्री. सुनिल मधुसुदन नाईक असे कायदेशिर वारस आहेत यांचे व्यतिरिक्त कोणीही वारस नाहीत. तरी तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांचे भाऊ (अविवाहीत) कै. अनिल मधुसुदन नाईक आणि बहिण (अविवाहीत) कै. सुरेखा मधुसुदन नाईक यांचे मृत्यु पश्चात सदर मिळकतीचे आमचे अशिल असे कायदेशिर एकमेव वारस आहेत. त्याबाबत कोणाची हरकत अथवा तक्रार असल्यास अथवा कोणीही वारस असल्याचा दावा निर्माण केल्यास त्यांनी ही नोटीस मराठी पेपरमध्ये प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खाली नमुद केलेल्या पत्यावर आपली तक्रार वा हरकत कागदोपत्री पुराव्यानिशी कळवावी, जर मुदतीत तशा प्रकारची हरकत वा तक्रार न आल्यास मुदतीनंतर आलेल्या काहीही तक्रारी व हरकती यांचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- १४/०३/२०२४ सही/-
ॲड. सुनिता एस. गोळे
दुकान क्रं. ३, फुड बॉक्स जवळ, साईबाबा
मंदिराच्या मागे, कोर्ट नाका, ठाणे (प) ४००६०१.
मो.नं. ९८१९८१५५५३

### PUBLIC NOTICE
### IN THE COURT OF CIVIL JUDGE (S. D.), KALYAN AT KALYAN

(COURT: SMT. M. Y. DOIPHODE, 3RD JOINT CIVIL JUDGE)
CIVIL MISC. APPLICATION NO. 205 OF 2024 Exh. No.05

Ajit Tukaram Shinge
Age: 59 years, Occ: Retired,
Residing at: Room No. 203, Wing-B, Gayatri Sankul Sanewadi, Badlapur Gaon Road, Near Sai Darbar Mandir, Badlapur (West) -Thane, Thane (Maharashtra) - 421 503
Mobile No.: 9730 22 6301 .....Applicant

V/S

1) Apurva Ajit Shinge
Age: 27 years, Occ: Service,
Residing at: Room No. 203, Wing – B, Gayatri Sankul Sanewadi, Badlapur Gaon Road, Near Sai Darbar Mandir, Badlapur (West) - Thane, Thane (Maharashtra) - 421 503
2) Anuja Ajit Shinge
Age: 24 years, Occ: Service,
Residing at: Room No. 203, Wing- B, Gayatri Sankul Sanewadi, Badlapur Gaon Road, Near Sai Darbar Mandir, Badlapur (West) - Thane Thane (Maharashtra) — 421 503 ....Opponent(s)

1. The Applicant (husband) and deceased wife Smt. Avani Ajit Shinge, were married on 29.10.1995 at St. Ignatius Church Hall, Sat Rasta Mumbai and the said Smt. Avani Ajit Shinge was expired on 23.07.2023 at Badlapur.
2.The Opponents are the daughters of the deceased Smt. Avani Ajit Shinge.
3. The Applicant filed application for the succession of deceased Smt. Avani Ajit Shinge's movable and immovable properties as per Section 372 of the Indian Succession Act, 1925, those are: 1) flat owned solely under no. 1805, admeasuring 425.00 square feet of carpet area (as per RERA 443.05 square feet / MahaRERA Registration No. P51800001140 on 18th floor, A wing in 'Sheth Avante', at LBS Road, Kanjurmarg (W), Village of Hariyali, Taluka Kurla, District Mumbai Suburban, Mumbai, 2) as deceased was served an Assistant Teacher in primary department of Adarsh Vidya Mandir to collect and continue to receive monthly pensionary benefits and other pecuniary benefits on account of her service such as PF, Gratuity and other admissible benefits from the concerned authority and 3) to manage the funds of the account of The Thane Dist. Central Co-Op. Bank Ltd. under account no. 004300300005158 (Customer No. 00430002066) with Kulgaon Branch on her sole name.
4. If anyone is having objection for granting the said succession certificate, same shall be raised within 30 (Thirty) days from the date of publication of this public notice, failing which it will be presumed that there is no objection for grant of such succession certificate in favour of applicant. Any objections received thereafter may not be considered.
Given under the hand & seal of the court this 11/03/2024

Sd/- By Order
(Clerk) (Court Seal) Sd/-
Asst. Superintendent
Civil Judge S.D, Kalyan

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी दैनिक बित्तंबातमीला जबाबदार ठरविता येणार नाही, त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

### जाहीर नोटीस

मी, १. श्रीमती. कविता दामु पवार २. श्री. रविंद्र दामु पवार राहणार- लालचक्की विभाग, हनुमान मंदीर मागे, उल्हासनगर-४, असे जाहीर करतो की, मिळकत वॉर्ड नं. ४० नवीन मालमत्ता क्र. ४०CO००९००३८००, Area= ५२४ चौ.फुट, वरचा मजला, ही मिळकत मला श्रीमती. सुशीलाबाई दामु पवार यांच्याकडून नोटरी करुन बक्षिसपत्राने मिळाली आहे. नोटरी Reg No= १५५-B, Sr. No.१२६, दिनांक २३/०३/२०२२ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
१. श्रीमती. कविता दामु पवार
२. श्री. रविंद्र दामु पवार

ॲड. संतोष राठोड

### जाहीर नोटीस
### कल्याण येथील दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे कोर्टात कल्याण

चौकशी अर्ज क्र. १३१/२०२४

श्रीमती सुजाता प्रदीप शिवलकर
वय - ५६ वर्षे, व्यवसाय गृहिणी
रा. सी-५ / ४०६, यमुना को. ऑप. हौ. सोसायटी लोकग्राम, नेतिवली, कल्याण (पूर्व), जि. ठाणे ....अर्जदार

विरुद्ध

श्री प्रथमेश प्रदीप शिवलकर
वय ३० वर्षे, व्यवसाय- शिक्षण
रा. सी-५/ ४०६, यमुना को. ऑप. हौ. सोसायटी लोकग्राम, नेतिवली, कल्याण (पूर्व), जि. ठाणे ....सामनेवाले

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, अर्जदार यांचे पती प्रदीप पंढरीनाथ शिवलकर हे दिनांक ०५/०५/२०२१ रोजी कल्याण येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. अर्जदार यांचे पती प्रदीप पंढरीनाथ शिवलकर यांचे हयातीत त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

flat नं. सी-५ / ४०६, क्षेत्र ३८५ चौरस फुट (बिल्ट अप क्षेत्र), ३०८ चौरस फुट (चटई क्षेत्र), यमुना को. ऑप. हौ. सोसायटी लोकग्राम, नेतिवली, कल्याण (पूर्व), जि. ठाणे, शेअर certificate नं. २९, शेअर क्र. १३६ ते १४० हि मिळत आहे.
सदरची मिळकत मयत प्रदीप पंढरीनाथ शिवलकर यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. मयत प्रदीप पंढरीनाथ शिवलकर यांनी त्यांचे मृत्युपूर्वी कोणतेही मृत्युपत्र किंवा कोणतेही स्वरुपाचा लेख करुन ठेवलेले नाही. मयताचे पश्चात अर्जदार व सामनेवाले हेच कायदेशीर वारस असून या खेरीज अन्य कोणीही वारस मयत प्रदीप पंढरीनाथ शिवलकर यांना नाही. आणि त्या अर्थी अर्जदार यांनी मयत प्रदीप पंढरीनाथ शिवलकर यांचे वारस ठरवून मिळणे करिता वारस दाखला मिळणेकामी अर्ज केला आहे. तरी संबंधिताना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि अर्जदार यांना वारस दाखला देण्याचे कामी कोणाची काही हरकत, हक्कहितसंबंध वैगैरे असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत लेखी पुराव्यानिशी स्वतः वकिलामार्फत आपली हरकत या अर्जाच्या कामी दाखल करावी. मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास अर्जदाराने अर्जात विनंती केल्याप्रमाणे वारस दाखला देण्याबाबतचा आदेश मा. न्यायालय करेल याची नोंद घ्यावी.
हि नोटीस माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे, दि. १३/०३/२०२४

सही/- हुकुमावरून
लिपिक (कोर्टाचा शिक्का) सही/-
सहाय्यक अधिक्षक

### जाहीर नोटीस
### तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी उल्हासनगर

यांचे कार्यालय, गांधी रोड उल्हासनगर-५
ईमेल : tahulhasnagar@gmail.com दुरध्वनी क्र.: -02512530568

१) श्री. विरभान हरी मोरे
रा. उल्हासनगर-३, जि. ठाणे .....अर्जदार

विरुध्द

२) निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर ....सामनेवाले

**तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणेः**

१. उपरोक्त अर्जदार यांचा/ची मुलगी मनाली विरभान मोरे यांचा जन्म उल्हासनगर येथे दिनांक २७/१०/१९९४ रोजी झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्माची नोंद निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर दफ्तरी करुन जन्माचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या मुलाच्या जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. २. उशीरा जन्म नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दावा क्र २०/२०२४ दाखल केला आहे. ३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांचा/ची मुलगी मनाली विरभान मोरे यांचा जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.
आज दिनांक माहे १४/०३/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

(शिक्का) हुकुमावरुन
सही /-
कार्यकारी दंडाधिकारी, उल्हासनगर

Advocate - Vrunda V. Surve

### PUBLIC NOTICE
### IN THE COURT OF THE CIVIL JUDGE (S.D.) KALYAN, AT KALYAN

Civil. M. A. No. 169/2024 , Exh. No. -05
Next Date -16/04/2024

Mr. Vishwas Digumbar Ranade
Hindu, Age about - 64 yrs.,
Indian Inhabitant, Having address at flat no. 301/302, Ashirwad Exotica CHS Ltd, Rajaji Path, Ram Nagar, Opp. Keshar Kunj, Dombivali (East) 421 201. ...Petitioner /Applicant

V/S

1. Smt. Veena Gajanan Abhyankar
Hindu, Age about - 67 yrs.,
Indian Inhabitant, having address at:- Flat no. B2-303, Srushti residency, nw Kalyan Road, Behind RA K tower, Kanchan Gaon, Dombivali (E) - 421 201.
2. Mrs. Aparna Vishwanath Soman
Hindu, Age about - 54 yrs.,
Indian Inhabitant, having address at:- 190 Sethi Nagar, Ujjain - 456010, ...Respondents

Whereas above named applicant filed application for issuance of Probate Certificate in respect of following property of Deceased Digumber Vishnu Ranade and Sunita Digumber Ranade who died on 26.04.2019 and 29.01.2022 respectively intestate at Dombivali.
All that piece and parcel of immovable Flat bearing No. 301/302, Ashirwad Exotica Chs. Ltd., Rajaji Path, Ram Nagar, Opp. Keshar Kunj, Dombivali (East)- 421 201 and Shop No. 6, Ground floor, Building No. 2, Shree Dhanalaxmi Ekvira Building No. 2 CHS. Situated at all that piece and parcel of land bearing survey No. 61, Hissa No. 8C, Mauje Golavali, Dombivali (East) and within the limits of Kalyan Dombivali Municipal Corporation, Dombivali Division, within the Registration Dist. Thane and Sub-Registration Dist. Kalyan, having valuation of Rs. 1,42,00,000/- Crores/- approximately and the movable property which is more particularly described in the Schedule I herein attached having valuation of Rs. having valuation of Rs. 1,50,00,000/- Crores/- approximately /- approximately.
If anybody has Right, Interest or claim in the above mentioned Property then he/she may file his objection within 30 days from the date of publication hereof, failing which the Hon'ble court will issue Probate Certificate as claimed by Applicant.

**SCHEDULE I**
**IMMOVABLE PROPERTIES**

A. Flat bearing No. 301/302, Ashirwad Exotica Chs. Ltd., Rajaji Path, Ram Nagar, Opp. Keshar Kunj, Dombivali (East)- 421 201.
B. Shop No. 6, Ground floor, Building No. 2, Shri Dhanalaxmi Ekveera Building No. 2 CHS. Situated at all that piece and parcel of land bearing survey No. 61, Hissa No. 8C, Mauje Golavali, Dombivali (East) Above said both properties for the valued at Rs. 1,42,00,000/- Crores approximately.

**MOVABLE PROPERTIES**

1. Amount in the account No. 0202101030763 in the Canara Bank, Dombivali (East), Dist: Thane.
2. Amount in the account No. 20071703433 in the Maharashtra Bank, Dombivali (East), Dist: Thane.
3. Amount in the account No. 0020110100001537 in the Dombivali Nagari Sahakari Bank, Dombivali (East), Dist: Thane.
4. Amount in the account No. 33307364762 and 35411025599 and 35410814380 in the State Bank of India, Dombivali (East), Dist: Thane.
5. Amount in the account No. 109101000024 and 109101000025 in the ICICI Bank, Dombivali (East), Dist: Thane.
6. Amount in the account No. 7749 in the Kanchan Gauri Mahila Sahakari Patpedhi Ltd., Dombivali (East), Dist: Thane.
7. Investment in Shares and Mutual Funds.

Dated 13 Day of March, 2024 issued with sign and seal of Hon'ble court Kalyan
Date-13/03/2024 (Court Seal) By Order
Sd/-
Assistant Superintendent
Civil Court S.D. Kalyan

### जाहीर नोटीस

मी, श्रीमती बिमला दिपक भगवानियाँ राहणार-१९/१, भैय्यासाहेब आंबेडकर नगर, ओटी सेक्शन, उल्हासनगर-२, असे जाहीर करते की, मिळकत वॉर्ड नं. १९ नवीन मालमत्ता क्र. १९BO०१९७४४७०० Area=२०० चौ. फुट ही मिळकत मी श्री. शशीकांत गुरुनाथ भोईर यांच्याकडून नोटरी करुन खरेदी केली आहे. नोटरी Reg No.-१३ Sr. No.३३५ दिनांक ०९/०२/२०१८ तरी ही मिळकत प्रॉपर्टी माझे नांवे करावयाची असून त्यावर कोणाचे काहीही देणे घेणे, गहाण, दान, दुप्पट कर्ज, कब्जा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत कर विभाग अधिकारी/उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे लेखी अर्ज करून तक्रार नोंदवावी अन्यथा ७ दिवसानंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
श्रीमती बिमला दिपक भगवानियाँ

### जाहीर सूचना

जनतेच्या माहितीसाठी याद्वारे सूचना देण्यात येत आहे की माझे अशील श्रीमती. सरिता विलास गायकवाड या फ्लॅट क्र. 203, दुसरा मजला, बी विंग, विघ्नेश्वर रेसिडेन्सी, ब्राह्मण आळी, शहापूर, ठाणे 421601 चे मालक आहेत. (यापुढे संक्षिप्ततेसाठी 'तो फ्लॅट' म्हणून संबोधले जाते). सदर सदनिका मूळतः माझी अशील आणि तिचे पती श्री. विलास प्रभाकर गायकवाड यांच्या संयुक्त मालकीची असून, शेअर प्रमाणपत्र ३३ ला अनुसरून, अनुक्रमे ३२१ ते ३३० क्रमांका पर्यंतचे १० शेअर त्यांच्याकडे आहेत. तरी श्री विलास प्रभाकर गायकवाड यांचे 01-12- 2018 रोजी निधन झाले. त्यांची पत्नी श्रीमती. सरिता विलास गायकवाड आणि त्यांची अल्पवयीन मुलगी कु. लावण्या विलास गायकवाड हे त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. माझ्या अशीलाचा आता तो फ्लॅट विकण्याचा मानस आहे आणि श्री तुषार गजानन विशे यांच्यासोबत विक्रीसाठी करार करण्यास तयार आहेत. मी माझ्या वरील नमूद केलेल्या अशिलाच्या वतीने इतर कोणत्याही दावेदारांना कायदेशीर वारसांना वरील नमूद केलेल्या मालमत्तेबाबत कोणताही दावा, हक्क, शीर्षक, व्याज, विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, भेटवस्तू, ट्रस्ट, शुल्क, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, धारणाधिकार किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप असल्यास याद्वारे विनंती केली जाते की ते खाली नमूद केलेल्या कार्यालयात असलेल्या अधिकार्यांना लेखी कळवावे.
101, पहिला मजला, गणराज हाइट्स सीएचएसएल, गोविंद बच्छाजी रोड, ब्राह्मण विद्यालयाजवळ, चरई, ठाणे (प.) 400601.
या तारखेपासून 15 दिवसांच्या आत, असे न केल्यास दावा करणाऱ्या व्यक्तींना माफ केले गेले आहे असे मानले जाईल आणि/किंवा सोडून दिले, आणि त्यानंतर माझ्या अशिलांना हा फ्लॅट संभाव्य खरेदीदारांना विकण्याचा अधिकार असेल.

ठिकाण : ठाणे सही-
दिनांक : १४.०३.२०२४ अभिषेक रायबा बांद्रे,
ॲडवोकेट हायकोर्ट
कार्यालयः फ्लॅट क्र. 101, पहिला मजला, गणराज हाइट्स सीएचएसएल,
गोविंद बच्छाजी रोड, ब्राह्मण विद्यालयाजवळ, चरई, ठाणे (प) 400601.

ॲड. अर्चना पैठणकर

### जाहिर नोटीस
### कल्याण येथील दिवाणी न्यायालय (व. स्तर) यांचे न्यायालयात

चौकशी अर्ज नं. १८१/२०२४, नि. क्र. ०५

श्रीम. सविता अरविंद डफाळ ...अर्जदार

विरूध्द

श्री. अथर्व अरविंद डफाळ ....सामनेवाले

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार हे मयत कै. अरविंद सिताराम डफाळ यांची पत्नी या नात्याने वारस असुन तसेच सामनेवाला हे मुलगा या नात्याने वारस असुन कै. अरविंद सिताराम डफाळ यांचे निधन दिनांक १९/०९/२०२० रोजी डॉ. उपासने यांचे आर्शिवाद नर्सिग होम, कल्याण पश्चिम येथे कोरोना मुळे झालेले आहे. सदर मयताचे म्हणजेच कै. अरविंद सिताराम डफाळ यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

सदनिका मौजे नेतिवली, सर्व्हे नं. २६, पार्ट नविन सर्व्हे नं. २६अ/१/१, २७ जुना सर्व्हे नं. ११ व १२ गट क. २३ मधील लोकसुरभी बिल्डींग नं. सी / २ / ६०४–६, सहावा मजला, क्षेत्र ५३० चौ. फुट, गावाचे नाव नेतिवली, ता. कल्याण, जि. ठाणे बांधिव क्षेत्र ४९.५० चौ. मी. ही सदनिका तरी, सदरचे प्रकरण हे दिनांक २९/०४/२०२४ रोजी मे. कोर्टात सुनावणीकामी ठेवले असुन सदर मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अथवा व्यक्तीचा कायदेशीर हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार, हरकत वगैरे असल्यास, त्याने तशी लेखी हरकत हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत हया न्यायालयात हजर होऊन दाखल करावी. वरील मुदतीत कोणीही योग्य हरकत न दाखल केल्यास कोणालाही काहीही म्हणणे नाही. असे समजुन सदरहु मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल योग्य तो पुरावा घेवुन अर्जदारांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहु मयताचे मिळकतीचे वारस म्हणुन दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतीच्या विचार केला जाणार नाही.
आज दिनांक १३ मार्च २०२४ रोजी माझ्या सहिने दिले.

दिनांक : १४/०३/२०२४ हुकूमावरुन
कल्याण. (कोर्टाचा शिक्का) सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर) कल्याण

### IN THE COURT OF CIVIL JUDGE (SENIOR DIVISION) BELAPUR AT BELAPUR

CIVIL MISC. APPLICATION NO.1947 OF 2023 Exh No=06
Shri. Manoj Shivaji Mahajan and another Versus ...Applicants
Versus
NIL

The applicants above named have applied for Heirship certificate of the deceased Mrs. Aditi Manoj Mahajan who has expired intestate on 8th September 2023. The immovable properties belonging to the said deceased are as follows:

SCHEDULE-A

A. A residential apartment/flat no.NL-4/8/0:2 area admeasuring 24.86 sq. meters built up, ground floor, Ashtavinayak Owners Association, Sector-15, Nerul, Navi Mumbai 400 706.
B. A residential apartment/flat no.NL-4/8/0:3 area admeasuring 20.60 sq. meters built up, ground floor, Ashtavinayak Owners Association, Sector-15, Nerul, Navi Mumbai 400 706.
C. A residential apartment/flat no.NL-4/8/0:4 area admeasuring 26.24 sq. meters built up, ground floor, Ashtavinayak Owners Association, Sector-15, Nerul, Navi Mumbai 400 706.
The applicants above named have applied for Heirship certificate of Mrs. Aditi Majon Mahajan in respect of the above-mentioned properties. However, those who have theirs claims, rights, titles, interest and/or any objections for the grant of Heirship certificate in the name of the Applicants, should apply and/or lodge their respective objections, if any, within a period of 30 (thirty) days from the date of publication hereof in the Court. The objections received after a period of 30 days, as mentioned hereinabove, shall not be considered and the Heirship certificate will be granted in the name of the applicants as prayed for.
Given in my hand on this 4 day of

Sd/- By Order
Clerk (Court Seal) sd/-
Asst. Superintendent
Civil Court (S.D.), Belapur

Adv. M.A.Dere

### PUBLIC NOTICE
### IN THE HON'BLE COURT OF CJ (JD) ULHASNAGAR AT ULHASNAGAR

M.A. No. 14/2024.Exh No=05

1. SMT. SUBHADRA DADASO JADHAV,
Age-61 yrs, Occupation - Housewife,
2. SHRI. SHUBHAM DADASO JADHAV,
Age 27 yrs, Occupation - Service, Both
R/at-Room No. 10, Gurukunj Housing Socirty, Pathare Park, Ambernath (East), Tal - Ambernath, Dist. - Thane., 421501. ....Applicant

V/S

NIL ...Opponents

WHEREAS the applicant's abovenamed had filed in this court for declaration of legal heirs deceased Shri.Dadaso Bandu Jadhav who expired on dtd. 24/09/2023.
AND WHEREAS if any person has any objection for declaring abovementioned applicant as legal heirs and legal heirship in favor of applicants abovenamed same is invited to submit his/her/their objection in this court within the period of 30 days from the date of publication of this Public Notice.As such if no objection or claim of any nature is not received with the stipulated time of 30 days from the date of publication of this public notice. The Hon'ble court may pass appropriate order with respect to present application.
Given under my hand and seal of this court on this day 14/03/2024

Sd/- By order
Jr. Clerk (Court Seal) Sd/-
Assistant Superintendant
Civil Court J.D Ulhasnagar

### IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.) THANE AT THANE

Miscellaneous Application No.:- 1116/2023

1) Smt. Kalpana Kushalsingh Lodha
Age: 59 Years, Occ.:- Housewife,
Add.:- Flat No. 631, 6th Floor in building No. 5, known as 'Shiv Tirth Tower No 5 CHS Ltd.' Soham Park, Hari Om nagar, Mulund (E) Mumbai-400081 ...Applicant No. 1
2) Shri. Vivek Kushalsingh Lodha
Age: 33 Years, Occ.:- Business,
Add.:- Flat No. 631, 6th Floor in building No. 5, known as 'Shiv Tirth Tower No 5 CHS Ltd.' Soham Park, Hari Om nagar, Mulund (E) Mumbai-400081 ....Applicant No. 2
3) Mrs. Nisha Kushalsingh Lodha
Age: 27 Years, Occ.:-
Add.:- Flat No. 402, Ramshanti CHS Ltd., Ghantali Road, Naupada, Thane (W)-400602. ....Applicant No. 3

**PUBLIC NOTICE**

WHEREAS the abovenamed Applicants have filed this application in this court for grant of Heirship Certificate for formally recognizing them as Legal Heirs of deceased 'Kushalsingh Tejmal Lodha' who died intestate on 21/02/2023.
You, the public at large, are hereby given notice that if any person or party has any objection for grant of Heirship Certificate in favour of the Applicants then such person or party may appear in the court in person or represented by pleader and say/objections, if any, within 30 days from date of publication, failing which, it shall be presumed that there is no objection and the said application will be finally decided.

**SCHEDULE "A" (Moveable Properties)**

**I) Bank Accounts :-**

| S.N. | Properties | Amount Rs. (Approximate) |
|---|---|---|
| 1 | Savings A/c No. 0266101009397 in Canara Bank at Thane Kopri Colony (E) Branch | 37,55,437.07 (as on 29.9.23) |
| 2 | Current A/C No. 0266201001354 in Canara Bank at Thane Kopri Colony (East) Branch. | 3,11,844.04 (as on 16.2.23) |

**II) Equity Shares:-**

| S.N. | Stock Symbol | Company Name | Value Rs. (as on December 2022) |
|---|---|---|---|
| 1 | INE674K01013 ABCAPTIAL NSE | Aditya Birla Capital Limited | 3,154.20 |
| 2 | INE647001011 ABFRL NSE | Aditya BirlaFashion & retail Limited | 10,350.00 |
| 3 | INE373A01013 BASF NSE | BASF India Limited | 25,377.30 |
| 4 | INE274K01012 BTTL NSE | Bhilwara Technical Textiles Limited | 2,006.25 |
| 5 | INE172A01027 Castrolind NSE | Castrol India Limited | 46,304.40 |
| 6 | INE991C01034 Trading Suspended | Dion Global Solutions Limited | 76.50 |
| 7 | INE579B01039 ELPROINTL BSE | Elpro International Limited | 3,04,465.20 |
| 8 | INE515H01014 EMPIND BSE | Empire Industries Limited | 1,01,250.00 |
| 9 | INE183A01024 FINPIPE NSE | Finolex Industries Limited | 93,650.00 |
| 10 | INE159A01016 GLAXO NSE | Glaxosmithkline Pharmaceuticals Ltd. | 2,637.50 |
| 11 | INE047A01021 GRASIM NSE | Grasim Industries Limited | 25,852.50 |
| 12 | INE402L01017 NOT LISTED | Heal Thfore Technologies Limited | 112.88 |
| 13 | INE835D01023 HIRECT NSE | Hind Rectifiers Limited | 67,020.00 |
| 14 | INE560A01015 INDIAGLYCO NSE | India Glycols Limited | 76,760.00 |
| 15 | INE941A01017 NOT LISTED | Jog Engineering Limited | 701.44 |
| 16 | INE019A01038 JSWSTEEL NSE | JSW Steel Limited | 30,722.00 |
| 17 | INE717A01029 KENNAMET NSE | KENNAMETAL India Limited | 4,45,830.00 |
| 18 | INEOJ1Y01017 LICI NSE | Life Insurance Corporation of India | 53,398.80 |
| 19 | INE326A01037 LUPIN NSE | LUPIN Limited | 36,685.00 |
| 20 | INE291B01023 | Minosha India Limited NOT LISTED | 400.00 |
| 21 | INE490G01020 MOIL NSE | MOIL Limited | 5,475.70 |
| 22 | INE049101012 NAHARCAP NSE | Nahar Capital & Financial Services Ltd. | 1,63,025.85 |
| 23 | INE289A01011 NAHARINDUS NSE | Nahar Industrial Enterprises Ltd. | 5,555.00 |
| 24 | INE290A01027 NAHARSPING NSE | Nahar Spinning Mills Limited | 1,42,492.35 |
| 25 | INE234A01025 NOVARTIND NSE | Novartis India Limited | 14,840.10 |
| 26 | INE733E01010 NTPC NSE | NTPC Limited | 2,663.20 |
| 27 | INE716C01027 NOT LISTED | Oswal Spinning & Weaving Mills Ltd. | 452.00 |
| 28 | INE619A01035 PATANJALI NSE | Patanjali Foods Limited | 25,061.40 |
| 29 | INE752E01010 POWERGRID NSE | Power Grid Corporation of India Limited | 84,197.80 |
| 30 | INE301A01014 RAYMOND NSE | Raymond Limited | 1,10,302.50 |
| 31 | INE013A01015 RELCAPITAL NSE | Reliance Capital Limited | 1,107.15 |
| 32 | INE217K01011 RHFL NSE | Reliance Home Finance Limited | 417.45 |
| 33 | INE002A01018 RELIANCE NSE | Reliance Industries Limited | 71,321.60 |
| 34 | INE614G01033 RPOWER NSE | Reliance Power Limited | 387.45 |
| 35 | INE611A01016 RSWM NSE | RSWM Limited | 9,225.00 |
| 36 | INE611A20016 RSWM-RE NSE | RSWM Limited | 3,840.00 |
| 37 | INE806T01012 SAPPHIRE NSE | Sapphire Foods India Limited | 16,047.60 |
| 38 | INE062A01020 SBIN NSE | State Bank of India | 61,370.00 |
| 39 | INE324C01038 TRADING SUSPENDED | Sterling Biotech Limited | 350.00 |
| 40 | INE155A01022 TATAMOTORS NSE | TATA Motors. Limited | 1,939.75 |
| 41 | INE081A01020 TATASTEEL NSE | TATA Steel Limited | 66,463.50 |
| 42 | INEOGK401011 TATVA NSE | TATVA Chintan Pharma Chem Limited | 27,958.45 |
| 43 | INE109A01011 SCI NSE | The Shipping Corporation of India Limited | 15,226.40 |
| 44 | INE494B01023 TVSMOTOR NSE | TVS Motor Company Limited | 4,34,160.00 |
| 45 | INE250B01029 VINYLINDIA NSE | Vinyl chemicals (India) Limited | 99,610.00 |
| | TOTAL | | 26,90,244.22 |

**III) Corporate Bonds:-**

| ISIN | Company Name | Maturity date | No. of Bonds | Value Rs. |
|---|---|---|---|---|
| INE733E07JP6 | NTPC Limited | 25/3/25 | 14 | 175.00 |
| TOTAL | | | | 175.00 |

**IV) Mutual Fund Folios:-**

| ISIN UCC | ISIN Description | Folio No. | No. of Units | Current Value |
|---|---|---|---|---|
| INF204KO1323 MFRIL CO002 Plan Growth Option | Nippon India Growth Fund-Growth | 40485822573 | 13.436 | 39,052.94 |
| INF789FO1547 MFUTIB0031 | UTI Long Term Equity Fund (Tax Saving) Regular Plan | 544300149502 | 751.145 | 1,06,890.26 |
| TOTAL | | | | 1,35,943.20 |

**SCHEDULE 'B' (Immoveable Properties)**

| S.N. | Properties | Approximate Value |
|---|---|---|
| 1 | Shop No. 1 on Ground Floorin building known as 'Mirani Nagar CHS LTD' at Kopri Colony, Thane (E)-400603. | 59,50,000/- |
| 2 | Flat No. 631, admeasuring 651 Sq.ft. Carpet Area 6th Floor in building No. 5 known as 'Shiv Tirth Tower No. 5 CHS Ltd.' Soham Park, Hari Om Nagar, Mulund (E),Mumbai - 400081, alongwith Share Certificate No. 38 consisting of 5 shares of Rs. 50/- each numbered from 191 to 195 of said society. | 1,52,98,500/- |
| 3 | Flat No. 632, admeasuring 410 Sq.ft. Carpet Area 6th Floor in building No. 5 known as 'Shiv Tirth Tower No. 5 CHS Ltd.' Soham Park, Hari Om Nagar, Mulund (E), Mumbai- 400081, alongwith Share Certificate No. 39 consisting of 5 shares of Rs. 50/- each numbered from 196 to 200 of said society. | 96,35,000/- |

Given under my hand & seal on this 14 day of March 2024.

Sd/- By order
Jr. Clerk (Court Seal) Sd/-
Asst. Superintendent
Civil Court (S.D.) Thane

## थोडक्यात

### ठाण्याचा सफेद कांदा बाजारात दाखल

ठाणे : ठाणे व पालघर जिल्ह्यातील सफेद कांदा बाजारात दाखल झाला आहे. भिवंडी व वसईतील आठवडा बाजारात शेतकरी सफेद कांदा विक्रीसाठी घेऊन येत आहेत; मात्र लांबलेल्या कांदा हंगामामुळे दर वधारले आहेत. दोन किलोच्या माळेला ८० ते १०० रुपयांचा चढा भाव मिळत आहे. सफेद कांदा शेतात तयार झाल्यावर त्याची काढणी करून स्वच्छ धुतला जातो. त्यानंतर काही दिवस सावलीत सुकवतात. त्यानंतर या कांद्याच्या सुकलेल्या पातीच्या आधारे त्याच्या माळा बनवल्या जातात. पालघर जिल्ह्यात काही वर्षांपूर्वी जेमतेम उत्पादित होत असलेले हे कांदे औषधी गुणधर्मामुळे नागरिक शेतकऱ्याच्या घरी जाऊन खरेदी करत होते; मात्र आता पालघरसह ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मागणीनुसार जादा उत्पादन घ्यायला सुरुवात केली आहे.

खरिपाचा हंगाम संपताच रब्बी पिकांबरोबर जास्त प्रमाणात कांद्याचे उत्पादन शेतकरी घेत आहेत. तसेच उत्पादित कांदे स्वतः आठवडी बाजारात थेट विक्रीसाठी आणत आहेत. यात कोणताही अडत्या किंवा दलाल नसल्याने शेकऱ्यांना व ग्राहकांना दोघांनाही परवडणाऱ्या किंमतीत कांदे मिळू लागले आहेत; मात्र सध्या हंगामातील अगदी पहिलाच कांदा विक्रीसाठी आल्याने दोन किलोच्या माळेला ८० ते १०० रुपये असा चांगला भाव मिळत आहे. दोन ते चार आठवड्यानंतर हाच कांदा मोठ्या प्रमाणावर बाजारात आल्यानंतर माळेची किंमत कमी होईल व ग्राहकांना स्वस्तात कांदे खरेदी करता येईल, असे एका विक्रेत्याने सांगितले.

### विद्यार्थ्यांवर घरच्या इतकेच शाळेचे संस्कार महत्त्वाचे

मुंबई : छबिलदास हायस्कूलमध्ये बाळ अक्षिकर यांच्यामुळे प्रवेश मिळाला. आज आम्ही जे काही आहोत ते या शाळेच्या संस्कारामुळे आहोत. विद्यार्थ्यांवर घरच्या इतकेच शाळेचे संस्कार महत्त्वाचे आहेत, असे मत ज्येष्ठ अभिनेते ज्येष्ठ अभिनेते बाळ धुरी यांनी व्यक्त केले. जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या छबिलदास हायस्कूल या इमारतीचे १०० व्या वर्षात पदार्पण होत आहे. त्यानिमित्ताने छबिलदास वास्तू नाबाद १०० "वास्तू अभिवादन सोहळा" मंगळवारी (ता. १२) दादर येथे झाला होता. त्यावेळी ते बोलत होते.

विद्यार्थ्यांवर घरच्या इतकेच संस्कार शाळेने देणे महत्त्वाचे आहे. पूर्वी गुरुजी म्हणण्यात आपुलकी असायची. त्या वेळी जे गुरुजी त्या विषयातील तपस्वी होते. विद्यार्थी शिक्षक नाते असे होते की, चुकले तर ओरडायचे; पण त्यांच्या अंतकरणात आपुलकीचा, प्रेमाचा कोपरा होता. विद्यार्थी मोठे व्हावे, चांगले नाव करावे, असे त्यांना वाटायचे. ६२ वर्षे झाली शाळा सोडून झाली; तरी शिक्षकांची नावे अजूनही लक्षात आहेत. शाळेत आलो तेव्हा आम्ही बाहुले होते, शिक्षकांनी आम्हाला बोलके केले.या वेळी शब्दभ्रमकार रामदास पाध्ये, ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले, जनरल एज्युकेशन इन्स्टिट्युटचे अध्यक्ष डॉ. उल्हास कोल्हटकर उपस्थित होते.

# बेरोजगारांनाच मालक बनवणार : प्रदिप मिश्रा सरकार

## २०४७ मध्ये भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलीयन डॉलर बनवण्यात महाराष्ट्र अग्रेसर राहील : शिबु राजन




मुंबई :

राज्यातील बेरोजगार तरूणांना स्वतःचे उद्योग सुरू करण्यासाठी भारत सरकारच्या एमएसएमई पीसीआय एमएसएमई (पीसीआय अर्थात, प्रमोशन काऊन्सील ऑफ इंडिया ) मार्फत लोन उपलब्ध करून देणार आणि त्यांनाच उद्योगाचा मालक बनवणार, असा ठाम विश्वास एमएसएमई पीसीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप मिश्रा सरकार यांनी येथे व्यक्त केला. एमएसएमई पीसीआय महाराष्ट्रच्या पदाधिकाऱ्यांच्या राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या परेल,मुंबई येथील कार्यशाळेत ते बोलत होते.

आज बेरोजगार तरूण नोकरी मागत आहेत, परंतु त्यांना नोकरी मिळत नाही, त्यामुळे त्यांना एमएसएमई प्रमोशन काऊन्सिल ऑफ इंडियामार्फत लोन देऊन नोकरी मागणारा नव्हे, तर नोकरी देणारा उद्योजक बनवणारच,असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. पुढे ते म्हणाले, की एमएसएमई (सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग ) महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर १४४ प्रकारच्या उद्योगांना प्रोत्साहन, प्रशिक्षण, आवश्यक कर्ज आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी कटीबध्द आहे. काही महत्वाच्या योजनांमध्ये लाभार्थ्यांना प्रशिक्षण, उद्योग-व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मशिन्स, कच्चा माल पुरवणार, तसेच त्यांच्या उद्योगात तयार झालेला पक्का माल एमएसएमई पिसीआय स्वतः खरेदी करून घेऊन जाणार, म्हणजे उद्योजकांना मार्केटिंग करून आपला तयार माल बाजारात विकण्याची चिंता राहाणार नाही. सदर प्रक्रिया तब्बल ५ वर्षांपर्यंत सातत्याने सुरू राहाणार असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सिबु राजन यांनी एमएसएमई पिसीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपाध्यक्ष अविनाश मिश्रा तसेच दिलीप दादू यांचे विशेष स्वागत केले.आपल्या प्रास्ताविक भाषणात शिबु राजन यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, समाजातील सर्वात अधिक दुर्बल घटकांना एमएसएमई प्रमोशन काऊन्सिल ऑफ इंडियाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देणाऱ्या योजना राबवून त्यांना स्वतःचा उद्योग उभा करून देण्याची सुवर्णसंधी आलेली आहे. देशाचे एमएसएमई पिसीआयचे अध्यक्ष आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे आहेत. त्यांच्या मार्फत आपण बेरोजगार असलेल्या लोकांना उद्योग-व्यवसायाचे मालक बनवू शकतो. यामध्ये महिलांसाठी खूप चांगल्या योजना आहेत. त्याचा अधिकाधिक लाभ महिलांना देण्याचा आपण कसोसीने प्रयत्न करून महाराष्ट्राला नवा लौकिक मिळवून देऊ. त्यामुळे येत्या २०४७ मध्ये भारत जगातील ५ ट्रिलीयन डॉलर निर्माण करणारी अर्थव्यवस्था बनेल असा ठाम विश्वास व्यक्त करून राजन म्हणाले.

# घरासाठी अजून किती दिवस आंदोलन करायचे ?

## माथाडी हातगाडी कष्टकऱ्यांचा सरकारला सवाल



**रमेश औताडे**

मुंबई : माथाडी कामगारांना हक्काचे घर मिळावे म्हणून ₹ कापड बाजार कामगार नव गृहनिर्माण समिती ₹ च्या माध्यमातून सरकारदरबारी पाठपुरावा सुरू केला. सरकारने अद्यापही याबाबत आश्वासना शिवाय काहीच केले नाही. सरकार अधिवेशनात काहीतरी निर्णय घेईल म्हणून आझाद मैदानात आंदोलन सुरू केले. अधिवेशन संपले, आता आचारसंहिता जाहीर होईल. आमच्या मागण्या कधी पूर्ण होणार ? घरासाठी अजून किती दिवस आंदोलन करायचे ? असे अनेक प्रश्न आंदोलनातील माथाडी हातगाडी कष्टकरी सरकारला विचारत आहेत.

कापड बाजारातील माथाडी, हातगाडी गरीब कष्टकरी कामगारांना सहयाद्री नगर, चारकोप, कांदीवली, मुंबई येथे शासनाने दिलेल्या ७ एकर मोकळया भुखंडावर कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांच्या माध्यमातून प्रचलीत पध्दतीने घरे बांधून देण्याची मागणी आम्ही केली असून सरकार अद्यापही गंभीर नाही असे ॲड.धर्मराज जाधव यांनी सांगितले.

बांधकाम प्रस्तावास मंजूरी मिळावी, बांधकाम सुरु करण्याचे आदेश दयावेत, ७ एकर जागेवरील विकास आराखड्यातील इस्पितळ, मैदान, रस्ता इतर आरक्षण वगळावे, जिल्हाधिकाऱ्यांनी या जागेवर कोकण विभागाच्या आदेशानुसार कापड बाजार आणि दुकाने मंडळाला कामगारांच्या घरबांधणीसाठी बांधकामास मुदतवाढ मिळावी.

# टीएमटीतील सवलतीचा प्रवास फक्त महापालिका क्षेत्रातील महिलांनाच

ठाणे :

ठाणे महापालिकेच्या परिवहन उपक्रमांतर्गत महिलांना तिकीटामध्ये ५० टक्के सवलत तसेच ६० वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवास देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु हा निर्णय ठाणे महापालिका क्षेत्रातील म्हणजेच, ठाणे, कळवा, मुंब्रा आणि दिवा शहरातील नागरिकांना लागू असणार आहे. प्रवाशांना सवलत मिळविण्यासाठी ओळखपत्र सोबत ठेवावे लागणार आहे. त्यामुळे ठाण्याबाहेरून शहरात नोकरी किंवा कामानिमित्त येणाऱ्या महिला प्रवासी, जेष्ठ नागरिकांना सवलत किंवा मोफत प्रवास करता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्याकाही वर्षांपासून लोकसंख्या वाढली आहे. तसेच ठाणे शहरातील वागळे इस्टेट, घोडबंदर भागात मोठ्या कंपन्या, लघु उद्योगांची कार्यालये आहेत. येथील हजारो महिला आणि पुरूष कामगार प्रवासासाठी टीएमटी बसगाड्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. तसेच ठाणे शहरातून ठाणे रेल्वे स्थानकाच्या दिशेने अनेक महिला प्रवासी टीएमटी बसगाड्यांतून प्रवास करतात. ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात एकूण ३६४ बसगाड्या आहेत. त्यापैकी उपक्रमाच्या स्वतःच्या १२४ बसगाड्या आहेत. तर, उर्वरित २२० बसगाड्या ठेकेदारामार्फत जीजीसी तत्वावर चालविण्यात येत आहेत. एकूण ३६४ पैकी ३०० बसगाड्या प्रत्यक्षात प्रवासी सुविधेसाठी उपलब्ध होत आहेत.

ठाणे शहराची लोकसंख्या मागील काही वर्षांपासून वाढत आहे. सध्या शहराची लोकसंख्या २० ते २५ लाखांच्या घरात गेली आहे. ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाने अर्थसंकल्पामध्ये ४२७ कोटी १८ लाख रुपयांच्या अनुदानाची मागणी पालिकेकडे केली होती. परंतु महापालिका प्रशासनाने केवळ दोनशे कोटी रुपयांचे अनुदान देण्याचे जाहीर केले आहे.

# विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या प्रक्रियेचा भाग व्हावे- रवींद्र चव्हाण

## सरळ सेवेद्वारे नियुक्त कनिष्ठ अभियंत्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण




मुंबई, :

सार्वजनिक बांधकाम विभागात परंपरागत सुरु असलेल्या कामांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत, चिरकाल टिकणारे नाविण्यपूर्ण काम करून विभागाची प्रतिमा उंचावण्यासाठी प्रयत्न करा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या प्रक्रियेचा भाग होण्याचे आवाहन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) रवींद्र चव्हाण यांनी केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने सरळ सेवेद्वारे नियुक्त उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री श्री. चव्हाण बोलत होते. सरळ सेवेद्वारे नियुक्त 529 कनिष्ठ अभियंत्यांना (स्थापत्य) संपूर्ण राज्यभर नियुक्तीपत्र वितरणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 27 जणांना प्रातिनिधिक स्वरूपात चव्हाण यांच्या हस्ते नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले. मंत्री चव्हाण म्हणाले की, नवनियुक्त उमेदवारांनी सकारात्मक विचार, आत्मविश्वासाने देशाला आणि राज्याला नवी दिशा देणारे काम करावे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नव्या उमेदीच्या तरूणांना या प्रक्रियेत सहभागी करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची राज्य शासनाने अंमलबजावणी करत भरती प्रक्रिया मोहीम तातडीने व पारदर्शक पद्धतीने राबविली. ७८ हजार उमेदवारांपैकी ५२९ उमेदवारांची नियुक्ती केली आहे.

विकासासाठीचा पारदर्शक कारभार आणि देशाची महासत्तेकडे जाणारी ही वाटचाल असून यामध्ये यशस्वीपणे कार्य कराल, असा विश्वास मंत्री चव्हाण यांनी व्यक्त केला. २०४७ मध्ये देशाच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होणार असून अमृतमहोत्सवी काळात शासनाचा भाग होत आहात ही अभिमानाची बाब आहे.

# मातंग समाजातील विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी २८ मार्चपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई, :

मातंग समाजातील व तत्सम १२ पोट जातीतील विद्यार्थ्यांस प्रशिक्षण योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांनी २८ मार्चपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे मुंबई शहर/उपनगर जिल्हा व्यवस्थापक अंगद कांबळे यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, शैक्षणिक दाखला, ट्रान्सफर सर्टीफिकेट, आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, पासपोर्ट आकाराचे दोन छायाचित्र, उत्पन्नाचा दाखला इत्यादी कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय मुंबई शहर/उपनगर, रुम नं. ३, गृहनिर्माण भवन, म्हाडा बिल्डिंग, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ या पत्त्यावर अर्ज करावेत. २८ मार्च २०२४ नंतर कोणतेही प्रशिक्षणाचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. प्रशिक्षण विद्या वेतनासाठी विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयातून विनामूल्य मिळतील. जिल्ह्यातील मातंग समाज बांधव व तत्सम बारा पोटजाती मधील इच्छुक पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. प्रशिक्षणार्थी मांतग समाजातील व तत्सम बारा पोटजातीतील असावा, त्याचे वय १८ ते ५० वर्ष असावे. यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा. तसेच प्रशिक्षणार्थीने आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशील सादर करावा.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) जिल्हा कार्यालय मुंबई शहर/उपनगर प्रशिक्षण योजनेचे मुंबई शहरातील २०० मुंबई उपनगरातील २०० विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट आहे.

## विधिमंडळातील आर्थिक गैरव्यवहारावर झोड उठवून कारावास भोगणारे

# ज्येष्ठ पत्रकार प्रकाश गुप्ते काळाच्या पडद्याआड

मुंबई :



ज्येष्ठ पत्रकार प्रकाश गुप्ते यांचे दि. १२ मार्च रोजी सकाळी दुःखद निधन झाले. २२ जुलै १९४१ रोजी जन्मलेल्या प्रकाश गुप्ते यांनी वयाच्या ८३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. तृणमूल काँग्रेसच्या खासदार मोईत्रा यांनी प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतले म्हणून त्यांची खासदारकी रद्द करण्यात आली. परंतु ऐंशीच्या दशकात अशाच प्रकारचा विधिमंडळातील आर्थिक गैरव्यवहार चव्हाट्यावर आणणाऱ्या ख्यातनाम पत्रकार प्रकाश गुप्ते यांना सुमारे तीन महिने कारावास भोगावा लागला. एका ज्येष्ठ नेत्याने प्रकाश गुप्ते आणि अभय मोकाशी यांना विधिमंडळात प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतले जातात, अशी माहिती दिली. प्रकाश गुप्ते यांनी ती बातमी प्रसिद्ध केली. परंतु ही माहिती देणाऱ्या नेत्याने 'हात' वर केले. वर्तमानपत्राने सुद्धा प्रकाश गुप्ते यांच्या पाठिशी उभे राहण्याऐवजी कचखाऊ धोरण स्वीकारले आणि दुर्दैवाने प्रकाश गुप्ते यांना हक्कभंग प्रस्तावाला सामोरे जावे लागले. त्यांना सुमारे तीन महिने कारावास भोगावा लागला. त्यानंतर प्रकाश गुप्ते हे धाडसी पत्रकार एकटे पडले. अनेक वर्षे प्रकाश गुप्ते हे मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहून संघाला बातम्या बनवून देत होते. या धाडसी आणि उपेक्षित पत्रकाराला महाराष्ट्र शासनाच्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचा सुद्धा लाभ मिळू शकला नाही.

**Public Notice**

**IN THE COURT OF HON'BLE 7th JOINT CIVIL JUDGE (S.D.), THANE AT THANE SHRI S. B. PATIL SAHEB**

CIVIL MA 182/2024 Exh No. 6

1. Nurjahan Hussain Reza Shaikh @ Noorjahan Hussain Raza Shaikh
Through POA Mr. Rajeev Kumar Lalan Jha
Age: 30 years, occ: Trainer
Religion - Muslim,
R/at:- A/305, 3rd Floor, at Shree Krishna CHS Ltd., Skyline -2, Shanti Park,Mira Road East, Thane - 401107 District.Thane, Mob:- 7021212049
2. Master Raqib Hussain Raza Shaikh
Through natural guardian - Mother'
Through POA Mr. Rajeev Kumar Lalan Jha
Age: 6 years, occ: Student,
Religion - Muslim,
R/at:- A/305, 3rd Floor, at Shree Krishna CHS Ltd., Skyline - 2, Shanti Park,Mira Road East,Thane - 401107District. Thane

... Applicants

Vs.

NIL .....Opponent

Whereas the applicant has filed an application for grant of legal heirship certificate before the Hon'ble in respect of the property, more particularly described in the schedule hereunder, left by the deceased HUSSAIN REZA SHAIKH ALIAS SHAIKH HUSAIN RAZA died intestate on dated 10-05-2021 at Bharat Ratna Bhimsen Joshi Hospital, Bhayander (west) Thane.

And whereas if any persons have any right,title, interest of the share etc., any nature of the properties left by the deceased, described in the schedule hereunder the same be submitted in this Hon'ble court within a period of 30 days from the date on the publication of this public notice. As such, if no objection is received within the stipulated period of 30 days from the date of the publication of this notice, the Application of the Applicant shall be allowed and Legal Heirship Certificate shall be issued as prayed by the Applicant.

**SCHEDULE NO.1**

| | |
|---|---|
| Immovable Properties consisting of :- 100% share, right, title and interest of the deceased in the Ownership Flat No. 305, 3rd Floor, Type A, Shree Krishna Co-Operative Housing Society Ltd.,, Skyline 2 Shanti Park, Mira Road East, Thane, admeasuring about 46.53sq.mtrs., situated at land bearing Old Survey No.216 (Part), New Survey No. 48, Hissa No.2,Old Survey No. 221 (Part), New Survey No. 53, Hissa No. 2 and Old Survey No. 222 (Part), New Survey No. 54, Hissa No. 2 totally admeasuring 4433.85 sq. mtrs. situated at Village Penkarpada, Taluka and District Thane. Above property is SELF OCCUPIED | Amount Rs.40,00,000/- |
| Total | Rs.40,00,000/- |

Date 12 March 2024

Court Seal

By Order
Sd/-
Assistant Superintendant
Civil Court (S.D.) Thane

# राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पहिले स्वतंत्र अद्ययावत प्रशिक्षण केंद्र

मुंबई :

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मौजे वाटोळे येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाकरीता स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे. हे विभागाचे राज्यातील पहिलेच प्रशिक्षण केंद्र आहे. यामध्ये अद्ययावत अशा सर्व सुविधा असणार आहे. विभागातील अधिकारी, जवान, कर्मचारी यांच्या क्षमता वृध्दीसाठी प्रशिक्षण केंद्र उपयोगी ठरणार आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.



मंत्री श्री. देसाई म्हणाले की, प्रशिक्षण केंद्रात सायबर सेल कार्यान्वित राहणार आहे. या सेलच्या माध्यमातून अवैध मद्य विक्री व निर्मिती, अन्य राज्यातून आवक होणारे अवैध मद्य यामध्ये गुन्हे दाखल करणे, गुन्हे सिद्ध करणे, याबाबत कारवाया कारणे सोयीचे होणार आहे. या प्रशिक्षण केंद्राकरीता ३४८ कोटी रुपयांचा खर्च येणार असून ५० एकर जागा लागणार आहे. तसेच ५१ नवीन पदे प्रशिक्षण केंद्रासाठी मंजूर करण्यात आली आहेत. पोलिस विभागातील प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्य यांची प्रतिनियुक्तीवर सेवा घेवून प्रशिक्षण देण्यात येईल. नवीन पदांवरील व्यक्ती रुजू होईपर्यंत ही व्यवस्था राहील. सध्या विभागातील ७५० पदांची भरती प्रक्रिया सुरू असून एमपीएससीमार्फत १४४ पदे भरण्यात येणार आहेत. मंत्री श्री. देसाई म्हणाले की, राज्य उत्पादन शुल्क विभाग हा शासनास महसूल देणाऱ्या प्रमुख विभागांपैकी एक आहे. या विभागाद्वारे शासनास 2022-23 या आर्थिक वर्षात सुमारे 21 हजार 550 कोटी इतका महसूल जमा करण्यात आलेला आहे. 2023-24 या आर्थिक वर्षाकरिता 25 हजार 200 कोटी इतके महसुली उद्दिष्ट आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाला राज्यासाठी मोठा महसूल मिळवून देण्याचे उद्दिष्ट देण्यात येते. दरवर्षी या उद्दिष्टात वाढ करण्यात येत आहे. त्यानुषंगाने विभागातील अधिकारी/कर्मचारी त्यांना देण्यात आलेले उद्दिष्ट गाठण्यासाठी अवैध मद्य विक्री व निर्मितीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न करत असतात. त्याकरिता मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक कारवाया व गुन्हे नोंद करण्यात येतात. हे गुन्हे नोंदविणे, त्याचा तपास करुन गुन्हे सिद्ध करण्यास्तव कायदेशीर तरतुदीचे तसेच तपासकामी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे इ. बाबींचे ज्ञान आवश्यक असते. यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची शारीरिक क्षमता वृध्दिंगत करून शारीरिक व कायदेविषयक प्रशिक्षण देण्याकरीता विभागाचे अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारणी करणे गरजेचे होते, अशी माहितीही मंत्री श्री. देसाई यांनी दिली.

# संपादकीय

## संघाचे विचारमंथन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय प्रतिनिधी सभेची वार्षिक बैठक उद्या १५ मार्च २०२४ पासून नागपुरात सुरू होत असून या बैठकीत परिवर्तनाच्या पाच योजना चर्चिल्या जाणार असल्याची माहिती माध्यमांना देण्यात आली आहे. संघाचे शताब्दी वर्ष येत्या विजयादशमीपासून सुरू होत असल्यामुळे या प्रतिनिधी सभेतील चर्चा आणि निर्णयांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. परिवर्तनाच्या या पाच मुद्द्यांमध्ये स्वदेशी, नागरिक कर्तव्य, पर्यावरण, सामाजिक समरसता आणि कुटुंब प्रबोधन यांचा समावेश असल्याचेही सांगण्यात आले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठी गैरराजकीय सामाजिक संघटना म्हणून ओळखली जाते. या संघटनेची स्थापना १९२५ साली झाली. साधारणतः या दरम्यान भारतात विविध राजकीय आणि सामाजिक विचारधारा सक्रिय झाल्या होत्या. त्यातील बहुतेक सर्व विचारधारा काळाच्या ओघात विस्मृतीत तरी गेल्या आहेत किंवा अगदी औषधालाच जेमतेम शिल्लक राहिलेल्या आहेत. मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांची विचारधारा ही गत ९९ वर्षात फक्त वाढलीच नाही तर समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात रुजली आणि फोफावली सुद्धा. आज संघाशी संबंधित असलेल्या विविध संघटना विविध क्षेत्रात कार्यरत आहेत आणि या संघटना देखील संघ विचार सर्वदूर पोहोचवत आहेत.

संघाची मुळात स्थापना झाली ती स्वातंत्र्यलढ्यात हिंदूंचे सक्रिय संघटन पुढे यावे या हेतूने. मात्र त्यावेळी आघाडीवर असलेल्या इतर प्रमुख संघटनांनी त्यांना विरोधच केला. तरीही अशा विरोधाला तोंड देत संघ वाढला. कारण समाजात राष्ट्रीय भावना जागृत करणे आणि सुजाण सुसंस्कृत समाज घडवणे इतकेच मर्यादित ध्येय संघाने डोळ्यासमोर ठेवले होते. संघाने संघ म्हणून कधीही सत्तेचे राजकारण केले नाही किंवा इतरही क्षेत्रात ढवळाढवळ केली नाही. मात्र प्रशिक्षित सुसंस्कारित कार्यकर्ते विविध क्षेत्रात पाठवले आणि सर्वत्र संघ विचार रुजवला. त्यामुळेच येत्या विजयादशमीला संघ ९९ वर्ष पूर्ण करून शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहे.

शताब्दी वर्षात संघाने ज्या पाच क्षेत्रात काम करायचे ठरवले आहे, त्यात सर्वप्रथम स्वदेशीचा मुद्दा घेतला आहे. स्वदेशी हा फक्त संघाचाच मुद्दा आहे असे नाही महात्मा गांधींनी देखील स्वदेशीचे आग्रह धरला होता. मात्र नंतरच्या काळात आपल्या देशात इम्पोर्टेड चे वेड अगदी पंतप्रधानांपासून तर झोपडीतल्या नागरिकापर्यंत प्रत्येकाला लागले आणि स्वदेशी पूर्णतः बाजूला पडली. त्यामुळे पुन्हा एकदा स्वदेशीचे जागरण ही स्वागतार्ह बाब आहे. तसेही देशात मोदी सरकार आल्यापासून स्वदेशीला जास्त उत्तेजन दिले जाते आहेच.

संघाच्या विचारमंथनातील दुसरा बिंदू हा नागरिक कर्तव्य असा असणार आहे. हा बिंदू देखील स्वागतार्हच म्हणावा लागेल. आपल्या देशात सर्वसामान्य नागरिक सर्वात आधी हक्काचा विचार करतो. मात्र कर्तव्याचे पालन कोणीच करत नाही. कायदे, नियम, प्रथा, परंपरा या धाब्यावर बसवत खुंटीला टांगून ठेवायच्या आणि मनमानी करत वागायचे हे आपल्या देशात प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे. माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी सांगायचे की नागपूर शहरात बिना लाईटचे सायकल चालवत पूर्ण शहरात फिरलो तरी मला पोलीस पकडणार नाही यावरून माझी प्रतिष्ठा ठरते. म्हणजेच मी किती कायदा मोडू शकतो यावर मी प्रतिष्ठित की अप्रतिष्ठित हे ठरते. आज हा प्रकार सर्वत्र रुढ झालेला दिसतो. त्यामुळे आज प्रत्येक नागरिकाला आपल्या हक्कांसोबतच कर्तव्याचीही जाणीव करून देणे आणि कर्तव्याचे पालन करायला लावणे ही आजची गरज आहे. समाज जीवनात परिवर्तन आणण्यासाठी संघाने उचललेले हे पाऊल निश्चितच स्तुत्य मानावे लागेल.

संघाच्या चिंतनातील तिसरा बिंदू हा पर्यावरणाचा आहे. आज फक्त देशातच नव्हे तर जगभरात पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे ग्लोबल वॉर्मिंग सारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहेत. त्यामुळे या मुद्यावरही चर्चा आणि कार्यवाही अपेक्षित आहेच. आम्ही विकास करतो खरा पण तो करताना पर्यावरणाचा ऱ्हास करतो हे कुठेतरी थांबायलाच हवे. या दृष्टीनेही संघाने पुढाकार घेतला हे निश्चितच स्वागतार्ह आहे.

आज देश एकविसाव्या शतकात पोहोचला आहे. तरीही जाती जमातीतील भेद हा कायम आहे. त्यावरून संघर्षही होतो. अनेकदा तो टोकाला जातो. हा मुद्दा लक्षात घेता सामाजिक समरसता ही आजची गरज आहे. संघाने त्यांच्या स्थापनेपासूनच सामाजिक समरसतेला प्राथम्यक्रमाने महत्त्व दिले आहे. संघ व्यवस्थेत जातीभेद पाळला जात नाही ,असा दावा केला जातो. तो खराही आहे. आज देश एकविसाव्या शतकात पुढे जात असताना जातीभेद संपून जातीभेद विरहित भारतीय समाज कसा घडवता येईल या दृष्टीने संघाचे हे प्रयत्न निश्चीतच विचार करण्याजोगे म्हणावे लागतील.

भारतात प्राचीन काळी वसुधैव कुटुंबकम ही परंपरा होती. इथे संयुक्त कुटुंब पद्धती होती. फक्त आपल्याच कुटुंबातले नाही तर नात्यातले इतर इतकेच काय तर परिचित स्नेही अशा सर्वांना परिवारात सामावून घेतले जात असे. परिवारातील प्रत्येक व्यक्तीबद्दल प्रेम, आपुलकी, जिव्हाळा असायचा.मात्र जागतिकीकरणाच्या रेट्यात हळूहळू परिस्थिती बदलत गेली. संयुक्त कुटुंब पद्धती बाजूला सारून न्यूक्लिअर फॅमिली सेटअप पुढे आला. आता तर कुटुंब पद्धतीच मोडीत काढली गेली आहे. लग्न न करताच लिव्ह इन रिलेशनशिप ही संकल्पना पुढे आली आहे. अजूनही अशा विविध गोष्टी पाश्चात त्यांच्या अंधानूकरणामुळे आपल्या देशातही रुजल्या आहेत. त्यामुळे कौटुंबिक जिव्हाळा संपून फक्त माझा स्वार्थ इतकाच विचार केला जातो आहे.हे प्रकार दूर करून आपण जे काही कुटुंब आज आहे, त्यांच्यात संवाद कसा होईल आणि त्यातून समाजाची जडणघडण कशी होईल, या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवा. त्यासाठीच कुटुंब प्रबोधन आवश्यक आहे. संघ त्या बाबतीतही पुढाकार घेतो आहे ही निश्चित अभिनंदनीय बाब आहे.

या प्रमुख मुद्द्यांवर तर संघ प्रतिनिधी सभा बैठकीत विचार मंथन होईलच. त्याचबरोबर देशातील इतर समस्या आणि आव्हाने यांच्यावरही चर्चा होईल हे नक्की. यात या विचारमंथनातून जे अमृत पुढे येईल ते निश्चितच भारतीय समाज जीवनाला नव संजीवनी देणारे ठरावे अशी अपेक्षा करायला हरकत नाही. प्रतिनिधी सभेच्या कार्यवाहीला बित्तंबातमीच्या हार्दिक शुभेच्छा...

# द्रमुकला पर्याय बनण्याचा भाजपचा प्रयत्न

राज्यरंग
राही भिडे

तमिळनाडूमध्ये सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) आणि विरोधी पक्ष अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (अण्णाद्रमुक) या दोन पक्षांचे राज्याच्या राजकारणावर वर्चस्व आहे. अण्णाद्रमुकमध्ये उभी फूट पडली आहे. भाजपशी त्याचे बिनसले आहे. लोकसभेच्या रणामध्ये हे राज्य महत्त्वाचे आहे. कारण दक्षिणेकडील या राज्यात लोकसभेच्या ३९ जागा आहेत. २०१९ च्या निवडणुकीत द्रमुक आणि काँग्रेस युतीने येथे वर्चस्व राखले आणि ३८ जागा जिंकल्या. अण्णाद्रमुकला एकच जागा मिळाली. त्या वेळी भारतीय जनता पक्ष आणि इतर प्रादेशिक संघटनांसोबत अण्णाद्रमुकची युती होती. एव्हाना येथे विविध पक्षांनी युतीसाठी चर्चा सुरू केली आहे. द्रमुकचे प्रमुख एम. के. स्टॅलिन यांनी श्रीपेरुंबदूरचे खासदार टी. आर. बालू यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या जागावाटप समितीशी चर्चा सुरु केली. दुसरीकडे, अण्णाद्रमुकने के. कृष्णसामी यांच्या पुथिया तमिझगम या पक्षाशी वाटाघाटी सुरू केल्या आहेत. पुथिया तमिझगमला भाजपचा पाठिंबा आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये भाजपने नाराज होऊन अण्णाद्रमुकशी असलेली युती तोडल्यानंतर भाजप एकाकी आहे. भाजपने आतापर्यंत जी. के. वासन यांच्या तमिळ मनिला काँग्रेसशी करार करण्यास सहमती दर्शवली आहे. एस. रामदास यांच्या पट्टाली मक्कल काचीबरोबरही भाजपची चर्चा सुरू आहे. द्रमुक हा 'इंडिया' आघाडीतील एक महत्त्वाचा पक्ष आहे. काँग्रेसने २०१९ लोकसभा आणि २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत त्याच्यासोबत युती केली होती. या दोन्ही निवडणुकींमध्ये द्रमुक आणि काँग्रेसने मोठे विजय मिळवले होते. तथापि, लोकसभेची निवडणूक कधीही जाहीर होण्याची शक्यता असताना द्रमुकने अद्याप काँग्रेस किंवा विदुथलाई चिरुथिगल काची सारख्या लहान पक्षांशी जागावाटप करार करण्यास सहमती दर्शवलेली नाही.

गेल्या लोकसभा निवडणुकीत तमिळनाडूमध्ये काँग्रेसने नऊ जागांवर निवडणूक लढवत आठ जागा जिंकल्या होत्या. लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस, द्रमुक यांच्यात कमालीचे सामंजस्य आहे; परंतु अजूनही जागावाटप ठरलेले नाही. अर्थात द्रमुक देईल तितक्या जागा निमूटपणे पदरात पाडून घेण्याशिवाय या पक्षापुढे अन्य पर्याय नाही. स्टॅलिन यांच्या द्रमुकने भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि माकप (एम) यांना प्रत्येकी दोन जागा तसेच इंडियन युनियन मुस्लिम लीग आणि कोंगू देसा मक्कल काची यांना प्रत्येकी एक जागा दिली आहे. २०१९ मध्ये, भाकप आणि माकपने चार जागा जिंकल्या होत्या. आययूएमएल आणि केडीएमके यांनी प्रत्येकी एक जागा लढवली, त्यात ते जिंकले. इधिया जननायागा कच्ची आणि



**लोकसभा निवडणूक जाहीर होण्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तमिळनाडूचा दौरा करत लाखो कोटी रुपयांच्या कामांचा प्रारंभ केला. भाजपला दक्षिणेत गमावण्यासारखे काहीच नाही. एक एक जागा महत्त्वाची असल्याने भाजपने तिथे हातपाय मारायला सुरुवात केली आहे. जुना मित्रपक्ष अण्णाद्रमुकशी जुळवून घेण्यासही भाजपने सुरुवात केली आहे. ते न झाल्यास द्रमुकला पर्याय होण्याची तयारी या पक्षाने केली आहे.**

कोंगुनाडू मक्कल देसिया काची हे धर्मनिरपेक्ष पुरोगामी आघाडी म्हटल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय गटाचे इतर सदस्य आहेत. त्यांनी दोन जागा लढवून जिंकल्या. द्रमुकच्या कनिमोझी यांनी २०१९ मध्ये निवडणूक जिंकली होती. ही जागा त्यांच्यासाठी सोडली जाऊ शकते. कनिमोळी यापूर्वी दोन वेळा राज्यसभेच्या खासदार होत्या. भाजपला रोखण्यासाठी गेल्या वर्षी जूनमध्ये 'इंडिया' आघाडीची स्थापना करण्यात आली. तथापि 'इंडिया' आघाडीला अद्यापही समाधानकारक जागावाटप जमलेले नाही. काँग्रेसने उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष, दिल्लीसह पाच राज्यांमध्ये आम आदमी पक्षासोबत आणि महाराष्ट्रात मित्रपक्षांसोबत आघाडी केल्यानंतर गेल्या महिन्यात परिस्थिती बदलत असल्याचे दिसते.

अण्णाद्रमुक आणि भाजपदरम्यान गेल्या वर्षी मतभेद झाले होते. भाजपचे प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांनी अण्णाद्रमुकचे संस्थापक आणि माजी मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन आणि त्यांचे गुरू सी. एन. अन्नादुराई यांच्यासह माजी आणि विद्यमान नेत्यांवर वारंवार हल्ला केल्यानंतर त्यांच्यातला वादंग वाढत गेला. भाजपने आपल्या पूर्वीच्या मित्रपक्षांशी संपर्क साधला आहे; परंतु सध्या त्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे. खरे तर पक्षाचे ज्येष्ठ नेते के. पी. मुनुसामी यांनी भाजपला अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना उमेदवारी देण्याचे थेट आव्हान दिले आहे. अण्णाद्रमुक नेत्याकडून निर्मला सीतारामन यांना मैदानात उतरवण्याचे आव्हान देण्यात आले असले तरी त्या हे आव्हान पेलण्याची शक्यता नाही. अण्णाद्रमुकने पुथिया तमिझगम पक्षाशी संपर्क साधला आहे. त्याने १९९८ मध्ये निवडणुकीत पदार्पण केल्यापासून या पक्षाने लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीमध्ये किरकोळ चुणूक दाखवली आहे. भाजप ऐतिहासिकदृष्ट्या राज्यात नॉन-परफॉर्मर राहिला आहे. कारण राज्यात द्रविड चळवळीचे वर्चस्व आहे. तिथे भाजपचे मतदान तीन टक्क्यांपेक्षा कमी आहे. परिणामी, येथे पंतप्रधान मोदी खूप सक्रिय झाले असून वर्षभरात चार दौरे केले आहेत. त्यांनी पक्षाचा अण्णाद्रमुकपर्यंत पोहोचण्याचा मार्ग प्रशस्त केला आहे.

गेल्या आठवड्यात चेन्नईमध्ये असताना त्यांनी अण्णाद्रमुकच्या सर्वेसर्वा आणि माजी मुख्यमंत्री जे. जयललिता यांचा वारसा सांगत द्रमुकवर हल्ला केला. जयललिता यांच्यावर टीका केल्यामुळेच अण्णाद्रमुक भाजपपासून दुरावला होता. या पार्श्वभूमीवर मोदी यांची भूमिका महत्त्वाची आहे. मोदी यांच्या चौथ्या दौऱ्यात भाजपने तामिळनाडूमध्ये मित्रपक्षांच्या शोधावर लक्ष केंद्रित केले आहे. एमजीआर आणि जयललिता यांच्यावर केलेली टीका विसरून आता मोदी यांनीच जयललिता आणि एमजीआर यांचे कौतुक केले; परंतु अण्णाद्रमुकचा राग अजून कमी झालेला नाही. अण्णाद्रमुकने 'स्वस्त राजकारण' या शब्दांमध्ये मोदी यांच्या भाषेचे वर्णन केले आहे. यासंदर्भात बोलताना अण्णाद्रमुकचे नेते डी. जयकुमार म्हणाले की आमची भूमिका स्पष्ट आहे. आम्ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये परतरणार नाही. दुसऱ्या बाजुने पाहिले असता लक्षात येते की भारतीय जनता पक्षाने तमिळनाडूच्या राजकीय परिदृश्यात पाऊल ठेवण्यासाठी ऐतिहासिक आव्हानांचा सामना केला आहे. आता पक्षाने तामिळनाडूच्या राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या सहयोगी भागीदाराशिवाय राजकारण सुरू केले आहे. द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके) आणि अखिल भारतीय द्रविड मुन्नेत्र कळघम (एआयएडीएमके) यांचे पारंपारिक वर्चस्व असलेल्या भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अण्णाद्रमुकने त्याग केला. भाजपलाही तमिळनाडूमध्ये अद्याप कोणत्याही महत्त्वपूर्ण पक्षाची साथ मिळालेली नाही. पक्षाची स्थिती मजबूत करण्यासाठी युती बांधण्यावर धोरणात्मक लक्ष केंद्रित केले जात आहे.

तमिळनाडूमध्ये मतांच्या टक्केवारीमध्ये तीन टक्क्यांपेक्षा कमी मतसंख्या असताना भाजप जी. के. वासन यांच्या तमिळ मानिला काँग्रेससारख्या संभाव्य मित्रपक्षांशी सहकार्य करत आहे. एस. रामदास यांचा पट्टाली मक्कल कच्ची, विजयकांत यांचा देसिया मुरपोक्कू द्रविड कळघम तसेच डॉ. के. कृष्णसामी यांच्या पुथिया थामिझगम या प्रमुख मित्रपक्षांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये सामील करण्यासाठी भाजपचे प्रयत्न सुरू आहेत. अर्थात हे करत असताना पक्षाला अण्णाद्रमुकसोबत समेट होण्याची आशा आहे. या घडामोडींदरम्यान, भाजपच्या राज्य युनिटने आगामी निवडणुकांसाठी उमेदवार निवड प्रक्रिया सुरू केली आहे. तथापि, राज्यात पक्ष रुजवण्याचे काम सोपवण्यात आलेल्या के. अण्णामलाई यांच्यासारख्या नेत्यांना उमेदवारी मिळेल की नाही याबाबत अनिश्चितता कायम आहे. याच सुमारास केंद्रीय मंत्री एल. मुरुगन यांची राज्यसभा खासदार म्हणून पुनर्नियुक्ती करणे हे तमिळनाडूच्या राजकीय परिदृश्यात अस्तित्व टिकवून ठेवण्याचे भाजपचे प्रयत्न अधोरेखित करते. भाजप विविध आव्हानांचा सामना करत निवडणुकीची तयारी करत असताना अण्णाद्रमुककडून थेट आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. एकीकडे ही स्थिती असताना कुणी मित्र मिळाले नाहीत तर स्वबळावर निवडणूक लढवून तमिळनाडूमध्ये किमान दहा टक्के मताधार मिळवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. आजघडीला राज्यात द्रमुकला सार्थ पर्याय दिसत नाही. असा पर्याय बनण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. या कामी पक्षाला कितपत यश येते, हे येता काळ सांगेलच.

**(अद्वैत फीचर्स)**

# भारताच्या आसाम मध्ये ४३ वर्षापुर्वी हरवलेल्या रेल्वेगाडीची सुरस कथा?

विशेष
विजय तारा नामदेव

5 डिसेंबर 2019

आशिया-आफ्रिका प्रदेशातील जंगलाचे मॅपिंग करणाऱ्या नासाच्या एका उपग्रहाने, भारताच्या आसाम मध्ये ईशान्येकडील एका घनदाट जंगलात काहीशी अस्पष्ट, धूसर अशी छायाचित्रे टिपली ज्यात *एक लांबलचक वस्तू* दिसत होती.

हे एखादे लपवून ठेवलेले आंतर-खंडीय बॅलिस्टिक मिसाईल (ICBM) असावे असा प्रथमदर्शनी त्यांना संशय आला व त्यांनी ती छायाचित्रे पेंटागॉनला संरक्षण खात्याकडे पाठवली.

त्यानंतर या क्षेत्रावर अनेक उपग्रह घुटमळू लागले, ज्याची नोंद आपल्या इस्त्रो, राष्ट्रीय तांत्रिक संशोधन विभाग आणि गुप्तचर संस्थांनी घेतली.

दरम्यान पेंटागॉनमधील रशियन आणि चीनी डबल एजंटांनी त्यांच्या देशांतील गुप्तचर संस्थेला, नासाने शोधलेल्या 'ICBM ट्रेन' बद्दल माहिती दिली आणि या देशांतील 'रॉ'च्या एजंट्सकडून ही माहिती भारतात आली.

आता धोक्याची घंटा वाजू लागली. कोणी जाणीवपूर्वक तर हे कृत्य केले नसेल ना? देशाला बदनाम करण्यासाठी एखाद्या विदेशी सरकारचा तर यात हात नसेल ना?

भारतीय पातळीवर चौकशी सुरू झाली.

पंतप्रधान कार्यालय, संरक्षण गुप्तचर संस्था, राष्ट्रीय तपास संस्था, संरक्षण मंत्रालय आणि कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटी यात सहभागी झाले.

मिलिटरी स्पेस कमांड आणि स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड यांनी त्या ठिकाणी अशी कोणतीही क्षेपणास्त्रे ठेवली नसल्याचे सांगितले.

पण त्यानंतरची हवाई पाहणी आणि आपले उपग्रह, इंडियन एअरफोर्स आणि एव्हिएशन रिसर्च सेंटरने घेतलेले फोटो, या सर्वांनी पुष्टी केली की तेथे खरोखरच एक गाडी उभी आहे.

अखेर, राष्ट्रीय संरक्षण कमांडच्या कार्यालयातील एका वरिष्ठ गुप्तचर अधिकाऱ्यासह मार्कोस आणि गरुड पथकातील कमांडोंची एक टीम घटनास्थळी पाठवण्यात आली.



जे दृश्य समोर आलं, ते अगदीच अविश्वसनीय होतं!

ईशान्य रेल्वेची, एक संपूर्ण रेल्वेगाडीच तिथे उभी होती

मागे जाऊन शोध घेतला, तेव्हा समजलं ते असं

16 जून, 1976

रेल्वेच्या कामकाजाचा नेहमीसारखाच एक दिवस आसाममधल्या 'तिनसुखीया' या छोट्याश्या रेल्वे स्थानकावर सकाळी एक रेल्वे मालगाडी आली. तिनसुखीया हे गुवाहाटीपासून 480 किमी पूर्वोत्तर आणि अरुणाचल सीमेपासून सुमारे 80 किमी अंतरावर आहे.

प्लॅटफॉर्म तसा छोटाच, एकावेळी फक्त दोन रेल्वे गाड्या उभ्या राहतील, एवढाच!

रेल्वे गाडीतील सर्व माल उतरवल्यावर रेल्वे गाडी तिथून हटवणं भाग होतं, कारण पुढील अर्ध्या तासात त्याच रेल्वे ट्रॅकवरून गुवाहाटीला जाणारी एक्सप्रेस येणार होती.

रेल्वे इंजिन ड्रायव्हरला, रेल्वेगाडी सायडिंगला लावण्याचा आदेश दिला गेला.

पण सर्वात जवळचं सायडिंग होतं तिथून 3 किलोमीटर लांब. सायडिंग साठी ती रेल्वेगाडी तिथपर्यंत गेली. 16 जून 1976 रोजी सकाळी 11:08 वाजता गाडी तेथे पोहोचल्याचे रेल्वेच्या नोंदीवरून दिसून आले.

डॅनियल स्मिथ, रेल्वेइंजिन चालक ड्रायव्हरने , सायडिंग ठिकाणी रेल्वेगाडी पार्क केली, व तो परत चालत चालत चालत पुन्हा 'तिनसुखीया रेल्वेस्थानकावर' आला.

आणि..

त्याच दिवशी अर्ध्या तासातच म्हणजे सकाळी 11:31 वाजता मुसळधार पाऊस आला आणि काहीच तासांत तेथे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. रेल्वे बोर्डाने केलेल्या चौकशीतून असे दिसून आले की, त्यावेळेस स्थानिक रेल्वे कर्मचारी वाहतूक सातत्य राखण्यात, ट्रॅकची दुरुस्ती करण्यात आणि पुराच्या समस्येला तोंड देण्यात पूर्णपणे गुंतले होते. जवळपास संपूर्ण रेल्वेस्टेशन 5 ते 6 फूट पाण्यात बुडाले होते.

येणाऱ्या सर्व रेल्वेगाड्या जागच्या जागी ठप्प झाल्या होत्या. गावकऱ्यांच्या मदतीने रेल्वे प्रशासनाने त्यातील सर्व प्रवाशांना खाली उतरवले व वेगवेगळ्या मार्गांनी त्यांची जाण्याची सोय केली.

या सर्व गडबडीत बरेच दिवस निघून गेले. रेल्वे स्टेशनमास्तरांची बदली झाली. पुढील काही महिन्यांत बरेचसे रेल्वे कर्मचारीही बदलले.

आपली एक रेल्वेगाडी सायडिंगला उभी आहे, याचा सर्वांना विसर पडला.

सायडिंगची जागाही तशी निर्जन!

लोकांचं त्या बाजूला फारसं जाणं येणंही नव्हतं. हळूहळू झाडांनी संपूर्ण परिसर व्यापला. क्वचितच वापरल्या जाणाऱ्या साइडिंगकडे जाणाऱ्या रेल्वेट्रॅकचे अवशेष; जे पुरात वाहून गेले होते; लवकरच झाडे झुडुपे आणि तणांच्या जंगलात रेल्वेगाडी दिसेनासे झाले. तेथील साप, पक्षी आणि वन्य प्राण्यांना आयतंच एक घर मिळाले होते, त्यांचा मुक्त वावर तेथे रेल्वेगाडीत होता.

बराच काळ लोटला. तेथील उरले सुरले जुने रेल्वे कर्मचारीदेखील निवृत्त झाले, तर काहींचे निधन झाले. या सायडिंग बाजुला डोंगरात लावलेल्या रेल्वेगाडीची आठवण कोणालाच नव्हती.डॅनियल स्मिथ, रेल्वेइंजिन चालक, तिनसुखीयाच्या घटनेनंतर, तीन महिन्यातच सप्टेंबर 1976 मध्ये, भारतीय रेल्वे सोडून तो ऑस्ट्रेलियाला स्थलांतरित झाला.

नासाच्या उपग्रहाने टिपलेल्या त्या चित्राने त्या सायडिंग रेल्वेगाडीचा तर शोध लागलाच, पण यासाठी कामाला लागलेल्या सर्व संरक्षण पथकांनीदेखील सुटकेचा निःश्वास टाकला.

खरोखरच जर तिथे काही आंतर-खंडीय बॅलिस्टिक मिसाईल सापडले असते तर, साऱ्या जगाला तोंड द्यावे लागले असते.

सलग 43 वर्षे ह्या सायडिंग लावलेल्या रेल्वेगाडीबद्दल भारतात कोणालाच काही माहीत नव्हते, हे जगातले कितवे आश्चर्य?

आहे का नाही अजब कारभार !!!

**साभार...!**

## दास वाणी

**चंचळ चळे स्वप्नाकार ।**
**निश्चळ देव तो निराकार ।**
**आत्मनिवेदनाचा प्रकार ।**
**जाणिजे ऐसा ॥**
**ठावचि नाहीं चंचळाचा ।**
**तेथें आधीं आपण कैचा ।**
**निश्चळ आत्मनिवेदनाचा ।**
**विवेक ऐसा ॥**

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**
**दासबोध : १२/०५/१९-२०**

चंचळ म्हणजे विकारी.

मायेपासून जन्मलेला.

जीव चंचल आहे म्हणून त्याला जागृती,स्वप्न,सुषुप्ती इत्यादी विकार आहेत.

सत्व,रज,तम या विकारांनुसार त्याची वर्तणूक सतत बदलत राहाते.

परब्रह्म मात्र निश्चळ आहे.

निर्विकार आहे.

ते निराकारही आहे.

विकारी जीव अविकारी परब्रह्मामधे एकरूप झाला की ते जीवब्रह्माचे ऐक्य चंचळ आत्मनिवेदन समजावे.

परब्रह्माच्या दृष्टीने पाहिले तर मायेला आणि चंचळाला वेगळे असे अस्तित्वच नाही.

अगा जे घडलेचि नाही ।
त्याची वार्ता पुससी कायी ।

अशा स्थितीमधे जीवाला वेगळेपण असे रहातच नाही.

मी ब्रह्मस्वरूपच असल्याने 'मी' वेगळा काढला जाऊ शकत नाही.

अहं ब्रह्मास्मि ।

हेच ते निश्चळ आत्मनिवेदन होय.

आत्मनिवेदननाम समास

**श्रीराम**
**सुप्रभात**
**मिलिंद**

## थोडक्यात

### वागळे इस्टेट येथील भाड्याच्या इमारतीत जिल्हा परिषदेचे कार्यालय

ठाणे : जिल्हा परिषद ठाणे ग्रामीण भागातील शासकीय कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावत असते. जिल्हा परिषद अंतर्गत होणारा कारभार सांभाळण्यासाठी ही वास्तू भक्कम असणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. जिल्हा परिषद ठाणे येथील इमारत १९६५- ६६ साली बांधण्यात आली होती. मुख्य इमारत अतिधोकादायक असल्याने मार्च २०१९ रोजी इमारत पाडण्यात आली. याच ठिकाणी नवी प्रशासकीय इमारत बाधंण्यात येणार आहे. म्हणून पुढील तीन वर्षांसाठी स्क्वेअर फिट होम्स, एस.जी. बर्वे रोड, जि. एस.टी. भवन समोर, वागळे इस्टेट, एम.आय.डी.सी, २२ नंबर सर्कल, ठाणे-(प) येथे भाडेतत्त्वावर घेतलेल्या इमारतीत जिल्हा परिषदेचे कामकाज सुरू करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेचे कामकाज वागळे इस्टेट येथील भाडेत्तत्वावर घेतलेल्या इमारतीत स्थलांतर करण्यात आले असल्याने सर्व ग्रामस्थांनी यांची नोंद घ्यावी. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग बी. जे. हायस्कूल येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. जिल्हा परिषद ठाणे येथील सार्वजनिक बांधकाम विभाग आवारातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व बांधकाम विभाग आहे त्याच इमारतीतून कामकाज करतील अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे यांनी दिली आहे.

### डोंबिवली येथील बेकायदा बांधकामावर कारवाई करा

**पालिकेचे एमआयडीसीला पत्र**

डोंबिवली : शिळफाटा रस्त्यावरील येथील एमआयडीसी भागातील नेकणीपाडा बस थांब्याजवळ उभारण्यात आलेल्या बेकायदा बांधकामावर एमआरटीपी अंतर्गत कारवाई करून संबंधितांवर गुन्हे दाखल करा, असे पत्र कल्याण डोंबिवली पालिकेच्या ई प्रभागाने एमआयडीसी डोंबिवली विभागाचे कार्यकारी अभियंता शंकर आव्हाड यांना मंगळवारी पाठविले आहे. पत्र देऊनही एमआयडीसीकडून मुख्य वर्दळीच्या रस्त्यावरील नेकणीपाडा बस थांब्याजवळ सुरू असलेल्या बेकायदा बांधकामांवर, या नवीन बांधकामाच्या शिवसेना शाखेच्या फलकावर एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता शंकर आव्हाड कारवाई करत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या बेकायदा बांधकामावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, माजी महापौर पुंडलिक म्हात्रे, शहरप्रमुख राजेश मोरे, माजी सभापती दीपेश म्हात्रे यांच्या प्रतिमांचा फलक लावून शिवसैनिक सचीन कासार हे बेकायदा बांधकाम करत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. बेकायदा बांधकामातील शाखेच्या फलकावर सचीन कासार यांची प्रतीमा आणि ठळक अक्षरात नाव आहे.

## ४२वेळा रणजी करंडकावर ताबा

# मुंबई पुन्हा चॅम्पियन

### रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा

मुंबई :

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्त्वाखालील मुंबई संघाने अंतिम सामन्यात विदर्भच्या संघावर दणदणीत विजय मिळवत ८ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर रणजी ट्रॉफीचे जेतेपद पटकावले. मुंबईच्या संघाने विक्रमी ४२व्यांदा रणजी करंडकावर आपलं नाव कोरलं आहे. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्त्वाखालील संघाने या हंगामात अष्टपैलू कामगिरी करत अंतिम सामन्यात विदर्भाचा १६९ धावांनी पराभव केला. विदर्भच्या संघानेही कडवा प्रतिकार करत मुंबईला सहज विजय मिळवू दिला नाही. अक्षय वाडकर, करूण नायर आणि हर्ष दुबे यांनी मुंबईने दिलेले डोंगराएवढे लक्ष्य गाठण्याचा आटोकाठ प्रयत्न केला खरा पण



मुंबईच्या शिलेदारांनीही काही शेवटपर्यंत माघार घेतली नाही आणि रणजी करंडक पटकावला. धवल कुलकर्णीने त्याच्या अखेरच्या रणजी सामन्यात शेवटच्या षटक टाकत १०वी विकेट घेतली आणि मुंबईचा संघ पुन्हा एकदा चॅम्पियन संघ ठरला.

पाचव्या आणि शेवटच्या दिवसाचा डाव सुरू झाला तेव्हा विदर्भचा संघ ५ बाद २४८ धावांवर खेळत होता. त्यांना विजयासाठी २९० धावांची तर मुंबईला ५ विकेट्सची गरज होती. अक्षय वाडकर आणि हर्ष दुबेची जोडी मैदानात पाय रोवून उभी होती. वाडकरने रणजी फायनलमधील त्याचे दुसरे शतक पूर्ण केले होते.पण नंतर ९ चौकार आणि १ षटकार लगावत १०२ धावा करणाऱ्या शतकवीराला मुंबईच्या तनुष कोटीयनने शतकी खेळी केलेल्या अक्षय वाडकरला पायचीत करत विदर्भ संघाला मोठा धक्का दिला. तनुषनंतर तुषार देशपांडेने दुबेला झेलबाद करत विदर्भाच्या आशांवर पाणी फेरले.त्यानंतर आदित्य सरवटेची विकेटही देशपांडेच्या नावे होती. तनुष कोटीयनने षटकार लगावणाऱ्या यश ठाकूरला क्लीन बोल्ड केले. नंतर अजिंक्यने शेवटच्या विकेटची जबाबदारी अनुभवी धवलवर सोपवली आणि त्याने आपल्या शानदार गोलंदाजीने उमेश यादवला क्लीन बोल्ड करत सामना मुंबईच्या नावे केला. मुंबईने शेवटचं रणजी जेतेपद २०१५-१६ मध्ये पटकावलं होतं. मुंबईने सांघिक प्रदर्शनाच्या बळावर जेतेपद पटकावलं आहे.

## शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभापासून बांधकाम कामगार अनभिज्ञ

**रमेश औताडे**

मुंबई : बांधकाम कंत्राटदारांकडून बांधकाम कामगारांची नोंदणी होत नसल्याने अनेक बांधकाम कामगारांना सरकारी सवलती पासून वंचित रहावे लागत आहे. सरकारी तिजोरीत बांधकाम कामगारांच्या महामंडळाचा निधी पडून आहे त्याचा उपयोग या बांधकाम कामगारांना होत नाही . शासनाच्या विविध योजनांचा लाभ या कामगारांना मिळत नाही. या पार्श्वभूमीवर बांधकाम कामगारांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

बांधकामाच्या ठिकाणी होणारे अपघात टाळणे तसेच कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा या उद्देशाने कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. मात्र नोंदणी कुठे करायची ? कशी करायची याची माहिती बांधकाम कामगाराचे नेते कॉम्रेड मधुकांत पथारीया हे वेळोवेळी देत असतात मात्र कंत्राटदाराच्या असहकार्यामुळे मधुकांत पथारिया यांच्या सहकार्याला म्हणावे तेवढे यश मिळत नाही.

नोंदणी करण्यासाठी बांधकाम कामगारांचे वय 18 ते 60 असावे त्या कामगारांनी मागील वर्षभरात किमान 90 दिवस बांधकामाच्या ठिकाणी बांधकाम कामगार म्हणून काम करणे आवश्यक आहे मात्र कंत्राटदार या 90 दिवसांमध्ये सातत्य दाखवत नसल्याने कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नाही.सबके अच्छे दिन असे सांगत विविध विकास कामे सुरू आहेत. त्यामध्ये रस्ते ,इमारती अनेक ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटची बांधकाम होत आहेत.

## पश्चिम विभागीय खेलो इंडिया स्पर्धेसाठी किशोरी व मुली महाराष्ट्र संघ जाहीर

# वैष्णवी चाफे व सुहानी धोत्रे कर्णधार

मुंबई :

भारतीय खेल प्राधिकरण, भारतीय खो-खो महासंघ व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्यावतीने २० ते २१ मार्च या कालावधीत पश्चिम विभागीय खेलो इंडिया खो-खो लीग १४ व १८ वर्षाखालील किशोरी व मुली गटातील स्पर्धेचे आयोजन मुंबईतील ओम साईश्वर सेवा मंडळ, पेरू कंपाउंड, मनोरंजन मैदान, लालबाग येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी राज्य खो-खो असोसिएशन चे सचिव ॲड.गोविंद शर्मा यांनी महाराष्ट्राचे दोन्ही संघ जाहीर केले.

महाराष्ट्र किशोरी संघाच्या कर्णधारपदी सांगलीच्या वैष्णवी चाफे ची तर मुली गटाच्या कर्णधारपदी धाराशिवच्या सुहानी धोत्रे ची निवड झाली आहे. पश्चिम विभागीय खेलो इंडिया महिला खो-खो लीगसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे १९ मार्च रोजी लालबाग, मुंबई येथे राष्ट्रीय स्पर्धापूर्व सराव शिबिर होणार आहे.







यंदाच्या हंगामामध्ये महाराष्ट्राच्या खो-खो संघाने राष्ट्रीयस्तरावर सुवर्णमय कामगिरी केली आहे. राष्ट्रीयस्तरावर महाराष्ट्राच्या संघांचा असलेला दबदबा हे दोन्ही संघ पश्चिम विभागीय स्पर्धेमध्येही कायम राखतील असा विश्वास राज्य खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईकनिंबाळकर, खो-खो फेडरेशनचे सहसचिव डॉ. चंद्रजीत जाधव, सचिव ॲड. गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. अरुण देशमुख यांनी व्यक्त केला आहे. संघातील सर्व खेळाडूंना राज्य खो-खो संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

किशोरी संघः वैष्णवी चाफे (कर्णधार, सांगली), मुग्धा वीर, मैथिली पवार, मुग्धा सातपुते, राही पाटील (धाराशिव), वेदिका तामखडे (सांगली), भवरम्मा उटगी (सांगली), श्रावणी तामखडे (सांगली), कल्याणी लामकाने (सोलापूर), धनश्री लव्हाळे (पुणे), अपर्णा वर्दे (पुणे).

# विक्रांत क्रिकेट संघाकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन

माथेरान :

क्रीडा क्षेत्रात मिळणाऱ्या यशाच्या मागे ज्या पाठीराख्यांचे प्रेम आणि सामर्थ्य असते त्यामुळेच कोणत्याही क्षेत्रात यश मिळते ही जाणीव ठेवून इंदिरा गांधी नगर येथील विक्रांत क्रिकेट संघाने नुकताच माथेरानमध्ये आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला होता. तर अन्य भरघोस बक्षिसे प्राप्त केली होती.त्या मिळालेल्या रक्कमेत आपल्याला ज्या पाठीराख्यांमुळे यश मिळाले त्या सर्व इंदिरा गांधी नगर रहिवाशांना एकत्रित करून १३ मार्चला काचवाला बंगला याठिकाणी स्नेहभोजनासह विविध मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. जादूचा खेळ,त्याचप्रमाणे मुलींसाठी आणि महिलांसाठी लकी ड्रॉ स्पर्धा



घेण्यात आली यामध्ये विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली.प्रथम क्रमांक मोबाईल,मिक्सर, टेबल फॅन, इस्त्री,कुकर अशी विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.यावेळी जवळपास चारशे पेक्षाही अधिक इंदिरा गांधी नगरचे रहिवाशी आणि गावातील अन्य प्रतिष्ठित नागरिक आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आतिष ढेबे, शैलेश ढेबे, करन जानकर, भावेश झोरे,धनगर समाज अध्यक्ष दीपेश ढेबे,प्रविण बावदाने,रामचंद्र ढेबे, संतोष आखाडे, महिला कार्यकारिणी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## एचआयएलद्वारे टॉपलाइनचे २६५ कोटी रुपयांना अधिग्रहण

# पाईप्स आणि फिटिंग व्यवसायाला गती देणार

मुंबई :

२.९ बिलियन अमेरिकन डॉलर्सची आर्थिक उलाढाल असलेल्या सीके बिर्ला समूहाचा एक भाग एचआयएल लिमिटेडने क्रेस्टिया पॉलिटेकसोबत करार केला आहे, ज्यानुसार एचआयएलने क्रेस्टियाच्या चार पूर्ण मालकीच्या उपकंपन्या टॉपलाइन इंडस्ट्रीज, आदित्य पॉलिटेक्निक, आदित्य इंडस्ट्रीज आणि साईनाथ पॉलिमर्ससोबत पूर्व भारतातील पाईप आणि फिटिंग्सचा एक लोकप्रिय ब्रँड, टॉपलाइन २६५ कोटी रुपयांना अधिग्रहित करण्याचे ठरवले आहे. क्रेस्टिया आणि त्यांच्या उपकंपन्या, टॉपलाइन, रॉकवेल आणि सोनिपलास्ट या तीन आघाडीच्या ब्रँडसह पाईप्स, फिटिंग्ज आणि वॉटर टॅन्क उद्योगात आघाडीवर आहेत. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये त्यांची आर्थिक उलाढाल अंदाजे ३३० कोटी रुपये आहे.

हे अधिग्रहण अंदाजे ५५,००० कोटी रुपयांच्या भारतीय पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंगजच्या बाजारपेठेत जलद गतीने वाढणाऱ्या पाईप्स आणि फिटिंग व्यवसायाला गती देण्याच्या एचआयएलच्या वचनबद्धतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. उत्पादने, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेच्या पूरक पोर्टफोलिओसह हे एचआयएलला तिची उत्पादन क्षमता लक्षणीयरीत्या वाढवण्यास आणि त्याचा महसूल जवळजवळ दुप्पट करण्यात मदत करेल.

या अधिग्रहणाबाबत अवंती बिर्ला यांनी सांगितले की, टॉपलाइन संपादनाचा करार आमच्या महत्त्वाकांक्षेशी सुसंगत असून एचआयएलमधील पाईप्स आणि फिटिंग व्यवसायासाठी आमच्या वाढीच्या धोरणाचा एक भाग आहे. दोन्ही संस्थांच्या एकत्रित समन्वयामुळे उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार होईल. आमच्यासाठी उत्पादन क्षमता आणि बाजारपेठेत वाढ होईल. २०२६ पर्यंत या श्रेणीतील आमच्या सध्याच्या आकाराच्या पाचपट होण्याची आमची महत्त्वाकांक्षा आहे. हे अधिग्रहण अफाट वाढीची क्षमता प्रदान करते. यामुळे आमचा महसूल केवळ दुप्पट होत नाही तर आमच्या उत्पादन क्षमतेतही तिप्पट वाढ होते, विशेषतः धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या पूर्वेकडील प्रदेशात. एचआयएलचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ अक्षत सेठ म्हणाले, टॉपलाइनच्या अद्वितीय क्षमता एचआयएलच्या पोर्टफोलिओला उत्तम प्रकारे पूरक ठरतात आणि आमच्यासाठी नवीन उत्पादन विभाग आणि बाजारपेठा उघडतात. यामुळे महत्त्वाच्या सरकारी प्रकल्पांमध्ये एचआयएलची उपस्थिती आणि १२ राज्यांमधील जल जीवन मिशनला मान्यता देखील वाढते. अलिकडच्या वर्षांत एचआयएलने बिर्ला एचआयएल या ब्रँड नावाने भारतात पाईप्स आणि फिटिंग्ज विभागात मजबूत उपस्थिती निर्माण केली आहे. पेटंट केलेले ट्रूफिट तंत्रज्ञान आणि क्लोरीनेटेड पॉलिव्हिनाईल क्लोराईड, अनप्लास्टिकाइज्ड पॉलिव्हिनाईल क्लोराईड, एसडब्ल्यूआर, भूमिगत ड्रेनेज सिस्टम पाईप रिंग्ज, फोमकोर आणि सायलेंट पाइपिंग सिस्टम्समधील असंख्य उत्पादन नवकल्पनांसह बिर्ला एचआयएल घरगुती, व्यावसायिक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील ग्राहकांच्या पसंतीची भागीदार बनली आहे.

# कासारवडवली राममंदिर तलाव सुशोभीकरणासाठी १५ कोटींचा निधी-प्रताप सरनाईक

**अनिल ठाणेकर**

ठाणे : कासारवडवली राममंदिर या तलावाचे सुशोभीकरण करून त्याठिकाणी संगीत कारंजे बसविण्यासाठी निधी देण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. यानंतर या कामासाठी राज्य सरकारकडून १५ कोटींचा निधी 'महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांचा विकास" या योजने अंतर्गत देण्यात आला. विशेष म्हणजे या प्रकल्प खर्चाचा १०० टक्के हिस्सा राज्य शासनाचा राहणार असल्याने राज्य सरकारच्या निधीतून हे काम होणार आहे. आता या तलावाचे सुशोभीकरण करण्याच्या कामासाठी महापालिकेकडून निविदा प्रक्रिया होऊन ठेकेदाराला कार्यादेश देण्यात



आला असून या वर्षाच्या अखेरपर्यंत हे काम पूर्ण होईल, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील घोडबंदर परिसरातील कासारवडवली राममंदिर येथील तलावावर काळे दगड वापरून घाटांचे बांधकाम करण्यात येणार असून त्या ठिकाणी संगीत कारंजे बसवून सुशोभीकरण करण्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते पार पडला.

ठाणे शहर हे तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते. परंतू, या तलावांचे सुशोभिकरण करून, जतन करून सांस्कृतिक वारसा जपणे गरजेचे आहे. आ. प्रताप सरनाईक यांच्याच संकल्पनेतून ठाण्यातील उपवन तलावाजवळ बनारस घाटाच्या धर्तीवर उपवन घाट बनविण्यात आला असून तेथे अनेक धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम वर्षभरात होतात. तेथे संस्कृती युवा प्रतिष्ठानकडून दरवर्षी होणार्या 'उपवन आर्ट फेस्टिवल"ला लाखो नागरिकांचा प्रतिसाद मिळतो. त्यामुळे कासारवडवली राममंदिर येथील तलावावर 'उपवन घाटाप्रमाणे बनारस घाटा"च्या धर्तीवर काळे दगड वापरून घाट बांधले जावे अशी संकल्पना असून जेणेकरून या घाटांचा उपयोग धार्मिक कार्यक्रमासाठी होईल.

# ९२ कोटींच्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन

रत्नागिरी :

९२ कोटी खर्चून रत्नागिरी येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात बांधण्यात येणाऱ्या नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुदळ मारुन आणि कोनशिला अनावरण करुन केले.

याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून), पालकमंत्री उदय सामंत, खासदार सुनिल तटकरे, आमदार योगेश कदम, जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, माजी आमदार प्रमोद जठार आदी उपस्थित होते.

नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ९२ कोटी खर्चून इमारत जमिनीखालील तळ मजला, तळमजला अधिक ८ मजले अशी असून इमारतीभोवती आपत्कालीन परिस्थितीत अग्नीशामक वाहन सहजपणे वावरण्याकरिता ९ मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित आहे. या इमारतीमध्ये जमिनी खालील तळ मजल्यावर शासकीय ४ चाकी ३५ वाहनांकरिता व १०० दुचाकी वाहनांकरिता वाहनतळ असून, तळ मजल्यावर अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या २० वाहनांकरिता वाहनतळाचा समावेश आहे. या इमारतीमध्ये जिल्हाधिकारी यांचे कार्यालयासह त्यांच्याशी संलग्न सर्व शाखांची कार्यालये, इतर ५२ शासकीय कार्यालये, ८० आसन क्षमतेचे सर्वसोयींयुक्त ३ समिती कक्ष, ३०० आसन क्षमतेचे जिल्हा नियोजन समिती सभागृह, तळमजल्यावर ८० आसन क्षमतेचे समिती सभागृह, २ नियमित उद्वाहने व १ आपत्कालीन परिस्थितीत वापरावयाचे उद्वाहन यांचा समावेश आहे. इमारतीमध्ये अंतर्भूत कार्यालयांकरिता उपहारगृह, प्रतिक्षालय प्रस्तावित आहेत. इमारतीच्या मागील बाजूस अभ्यांगताच्या १५० वाहनांकरिता वाहनतळ, बागबगीचा व सुशोभिकरण, तसेच सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर प्रकल्प प्रस्तावित आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या जयंती दिनी हेलीकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी-डॉ. महेंद्र कल्याणकर

**अशोक गायकवाड**

नवी मुंबई : भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्या जयंती दिनी हेली कॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करणे, चैत्यभूमी स्तूप व परिसराची सजावट, पुस्तक वाटपाकरिता स्टॉल, कायदा व सुव्यवस्था राखणे,अनुयायांनाच्या सोयीकरिता आवश्यकत्या सर्व बाबींचा व्यवस्था करण्याचे निर्देश यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी आढावा बैठकीत दिले.

चवदार तळे सत्याग्रहाच्या ९६ व्या वर्धापनदिन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती निमित्ताने पूर्वतयारी आढावा बैठक विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली कोकणभवन येथे समिती सभागृहात पार पाडली. या आढावा बैठकीवेळी रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे,



दूरदर्श्यप्रणालीद्वारे नवी मुंबई जिल्हाधिकारी संजय यादव, रायगड जिल्हा परिषदेचे (प्रभारी) मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे,महाडचे उपविभागीय अधिकारी ज्ञानोबा बानापुरे, रायगड अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, उप आयुक्त (सामान्य प्रशासन) अमोल यादव, रायगड समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, कोकण रिपब्लीकेशन सामाजिक संस्था,युनायटेड बुधिष्ट संस्थेचे पदाधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समिती सरचिटणीस नागसेन कांबळे, भन्ते, आदी उपस्थित होते.

डॉ.कल्याणकर यावेळी म्हणाले की, २० मार्च रोजी चवदार तळे सत्याग्रहाचा ९६ व्या वर्धापन दिनानिमित्त अनुयायांची मोठया संख्येने होणारी उपस्थिती पाहता सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वय ठेवून विविध सेवा सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात. शासकीय मानवंदना देण्याबाबत उचित कार्यवाही करणे, सर्व यंत्रणांमध्ये समन्वय साधून कार्यक्रम सुरळित पार पाडणे, कार्यक्रमस्थळी स्वच्छता निवास व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, चवदार तळे परिसर देखभाल व दुरुस्ती, पार्किंग व्यवस्था, दिशादर्शक माहिती फलक आदी सर्व व्यवस्था पार पाडण्याचे सूचना केल्या. त्याच बरोबर भारतीय संविधानाचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्या जयंती दिनी हेली कॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करणे, चैत्यभूमी स्तूप व परिसराची सजावट, पुस्तक वाटपाकरिता स्टॉल, कायदा व सुव्यवस्था राखणे,अनुयायांनाच्या सोयी करिता आवश्यकत्या सर्व बाबींचा व्यवस्था करण्याचे निर्देश यावेळी डॉ.कल्याणकर यांनी आढावा बैठकीत दिले.

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक संदीप चव्हाण यांनी बित्तंबातमी एसपी मीडिया प्रायव्हेट लिमिटेडसाठी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी. टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई-४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रित करून शॉप नं. ०७, साई बाबा को. ऑ. हौ. सोसायटी, कोपरी, ठाणे (पूर्व )-४००६०३, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ■ **संपादक : संदीप सदानंद चव्हाण,** दुरध्वनी क्रमांकः ८१६९१५१४९७/८३६९२९६५९६ ■ RNI.NO. MAHMAR ३९८३६/१९८२